मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ११२ ■ मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# सर्वोच्च न्यायालयाचा दणका

## तुरुंगातच राहणार माजी भाजप आमदार कुलदीप सेंगर; जामिनाला स्थगिती

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील २०१७ च्या गाजलेल्या उन्नाव बलात्कार प्रकरणात भाजपचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर यांना दिलासा देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या जामीन आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.२९) दिल्ली उच्च न्यायालयाचा जामीन आदेश स्थगित केला आहे.

मुख्य न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सेंगर यांना जामिनावर सोडू नये, असे स्पष्ट निर्देश दिले. या खंडपीठात न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांचा समावेश होता. तसेच, केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (CBI) दाखल केलेल्या याचिकेवर सेंगर यांना नोटीस बजावत त्याचे उत्तर मागवण्यात आले आहे.

सीबीआयतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात बाजू मांडताना, दिल्ली उच्च न्यायालयाच्या जामीन आदेशाला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली. प्रकरण गंभीर असून त्यावर सखोल विचार करण्याची गरज असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

दरम्यान, सेंगर यांचा २३ डिसेंबरला दिल्ली उच्च न्यायालयाने अटींसह जामीन मंजूर केला होता. त्यानुसार, पीडितेच्या



घरापासून ५ किलोमीटरच्या परिसरात प्रवेश न करणे, दिल्लीमध्येच वास्तव्यास राहणे आणि दर सोमवारी पोलीस ठाण्यात हजेरी लावणे, अशा कडक अटी घालण्यात आल्या होत्या. अटींचा भंग झाल्यास जामीन रद्द करण्याचा इशाराही न्यायालयाने दिला होता.उच्च न्यायालयाच्या या निर्णयांविरोधात पीडित व्यक्ती आणि तिच्या कुटुंबीयांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. पीडितेने जामीन आदेशाला आपल्या कुटुंबासाठी 'मृत्यूसमान' असल्याचे म्हटले होते. जामीन आदेशानंतर आपल्या कुटुंबाची, वकिलांची आणि साक्षीदारांची सुरक्षा काढून घेण्यात आल्याचा दावाही पीडितेने केला होता. “अशा प्रकरणात दोषीला जामीन मिळत असेल, तर देशातील मुली सुरक्षित कशा राहणार?” असा सवाल तिने उपस्थित केला होता.

**सेंगर यांना जन्मठेप का झाली होती?**

डिसेंबर २०१९ मध्ये दिल्लीतील विशेष न्यायालयाने सेंगर यांना भारतीय दंड संहिता (IPC) आणि पॉक्सो कायद्यान्वये दोषी ठरवत त्याला उर्वरित आयुष्यभर कारावासाची शिक्षा सुनावली होती. अल्पवयीन पीडितेवर बलात्कार केल्याचा आरोप न्यायालयाने सिद्ध केला होता.

**दिल्ली उच्च न्यायालयाने शिक्षा का निलंबित केली?**

उच्च न्यायालयाने प्राथमिक निरीक्षण नोंदवत म्हटले होते की, सेंगर यांच्याविरोधात पॉक्सो कायद्यातील ‘गंभीर स्वरूपाचा लैंगिक अत्याचार’ हा गुन्हा लागू होत नाही.

पॉक्सो कायद्याच्या कलम ५ अंतर्गत, जर असा अत्याचार सार्वजनिक सेवक, पोलीस, रुग्णालय कर्मचारी, कारागृह कर्मचारी किंवा अधिकाराच्या पदावर असलेल्या व्यक्तीकडून झाला असेल, तर तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा ठरतो आणि किमान २० वर्षांपासून जन्मठेपेपर्यंत शिक्षा होऊ शकते.मात्र, दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने सेंगर यांना पॉक्सो कायद्यातील ‘सार्वजनिक सेवक’ किंवा ‘विश्वासाच्या पदावर असलेली व्यक्ती’ म्हणून गणले जाऊ शकत नाही, असे मत व्यक्त केले होते.

**CBIचा आक्षेप काय?**

सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात ठामपणे मांडले की, विद्यमान आमदार हा घटनात्मक पदावर असलेला व्यक्ती असतो. तो जनतेचा प्रतिनिधी असून राज्य आणि समाजाच्या हिताशी निगडित सार्वजनिक कर्तव्ये पार पाडतो. त्यामुळे सेंगर यांना ‘सार्वजनिक सेवक’ मानले जाणे योग्य आहे.

तसेच, सेंगर हे प्रभावशाली व्यक्ती असल्याने जामिनावर सुटल्यास पीडितेच्या आणि तिच्या कुटुंबाच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा युक्तिवाद सीबीआयने केला आहे. यामुळे न्यायप्रक्रियेवरील जनतेचा विश्वासही डळमळीत होईल, अशी भीती तपास संस्थेने व्यक्त केली आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

२०१९ मध्ये विशेष CBI न्यायालयाने सेंगर यांना अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या प्रकरणात पीडितेच्या कुटुंबीयांवर हल्ले, धमक्या आणि दबाव टाकल्याचे आरोपही समोर आले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित सर्व प्रकरणांचा तपास CBIकडे देण्यात आला होता.याशिवाय, पीडितेच्या वडिलांच्या मृत्यूशी संबंधित स्वतंत्र प्रकरणात त्यांना २०२० मध्ये १० वर्षांची शिक्षाही सुनावण्यात आली आहे. सध्या सर्वोच्च न्यायालय या सर्व मुद्द्यांचा विचार करत असून, सेंगर यांच्या जामिनाबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित आहे.

# पनवेलमध्ये ११,४६० दुबार मतदारांचा शोध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** आगामी पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील घोळांवर अखेर पडदा पडू लागला आहे. प्रारूप मतदार यादीमध्ये २१,१६२ मतदार दुबार व बोगस असल्याच्या हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या, याची महापालिकेने सखोल छाननी केल्यानंतर तब्बल ११,४६० दुबार मतदार आढळून आले असून, या मतदारांकडून हमीपत्र घेण्यासाठी निवडणूक विभागाने प्रत्यक्ष क्षेत्रीय मोहीम हाती घेतली आहे. पुढील काही दिवसांत निवडणूक विभागाचे कर्मचारी घरोघरी भेटी देऊन संबंधित मतदारांकडून एका मतदान केंद्राची निवड निश्चित करून घेणार आहेत.

पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून, १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या ५,५४,५७८ मतदारांच्या प्रारूप यादीवर २९,४०६ हरकती दाखल झाल्या होत्या. यामध्ये स्वता मतदारांनी नोंदविलेल्या ५,५२६ तर इतरांनी नोंदविलेल्या १२,८५२ हरकतींचा समावेश होता. दुबार व संशयास्पद मतदारांबाबत एकूण २१,१६२ हरकती प्राप्त झाल्या, तसेच ९४५ मृत मतदारांची नावे यादीत असल्याचाही दावा करण्यात आला होता.या हरकतीनंतर निवडणूक विभागाने सॉफ्टवेअर प्रणालीच्या मदतीने छायाचित्रांची तुलना, नावे, पालकांची माहिती आणि पत्ता यांची पडताळणी केली.

# ठाण्यातील महिलेच्या अवयव दानातून सहाजणांना नवे आयुष्य

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही माणुसकीला कवटाळणारा निर्णय घेण्याचे धैर्य ठाण्यातील एका कुटुंबाने दाखवले. आपल्या प्रिय व्यक्तीच्या जाण्याच्या वेदना बाजूला ठेवत त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे सहा गरजू रुग्णांना नवे आयुष्य लाभले. मृत्यूनंतरही माणूस किती मोठा ठरू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण ठाण्यातून समाजासमोर आले आहे.

ब्रेन डेड घोषित झालेल्या ३८ वर्षीय महिलेच्या अवयवदानामुळे एकाच वेळी सहा रुग्णांचे प्राण वाचले. ठाण्यातील ही अशा प्रकारची पहिलीच घटना असून, तिचे अवयव ठाणे, मुंबई आणि दिल्ली येथील रुग्णालयांमध्ये पाठवण्यात आले. ठाणे येथील रहिवासी असलेल्या या महिलेला १९ डिसेंबर रोजी मेंदूत अचानक रक्तस्राव झाल्याने हाजुरी येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने २५ डिसेंबर रोजी तिला ‘ब्रेन डेड’ घोषित करण्यात आले. हा क्षण कुटुंबीयांसाठी अत्यंत वेदनादायी होता. मात्र याच कठीण काळात डॉक्टरांनी अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगितले. ‘आपल्या दुःखातून इतरांचे आयुष्य वाचू शकते’ या जाणिवेने कुटुंबीयांनी भावना आवरून समाजहिताचा निर्णय घेतला आणि अवयवदानासाठी संमती दिली. एका आईचा शेवटचा श्वास सहा जणांच्या जीवनाचा श्वास ठरला. २६ डिसेंबर रोजी डॉ. विनीत रणवीर आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाने अवयव काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.

# सौ. रेश्मा जगताप यांची शिवसेना( शिंदे गट )च्या सातारा जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे साहेब व डॉ. श्री. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. रेश्मा जगताप यांची शिवसेना सातारा जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



या नियुक्तीबद्दल सौ. रेश्मा जगताप यांनी पक्ष नेतृत्वाने आपल्यावर टाकलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, हा विश्वास सार्थ ठरवत शिवसेना संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे व जोमाने कार्य करणार असल्याचे सांगितले.

तसेच शिवसेना महाराष्ट्र प्रदेश सचिव माननीय श्री. संजयजी मोरे साहेब व श्री. राम रेपाळे साहेब यांचे मार्गदर्शन व पाठिंब्याबद्दल सौ. रेश्मा जगताप यांनी मनापासून आभार मानले.


त्यांच्या या नियुक्तीमुळे सातारा जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक बळकट होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# ‘थर्टी फर्स्ट’ला धिंगाणा घालाल तर ‘हॅप्पी न्यू इयर’ कोठडीत होणार!

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री जागोजागी पार्ट्या होतात. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मारामारीचेही प्रकार यावेळी घडतात. त्यातच निवडणुकांचा हंगाम सुरू असल्याने पोलिस प्रशासनाची चिंता वाढली आहे. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाची देखील तयारी सुरू आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी धिंगाणा घातला तर प्रशासनाकडून कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे मध्य प्राशन करून वाहन चालवू नका आणि कारवाईचे संकट स्वतःहून ओढवू नका असे आवाहन केले जात आहे.

मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. ब्रेथ मशीनद्वारे वाहन चालकाची तपासणी करून कारवाई होणार आहे. पनवेल महानगरपालिकेची निवडणूक सुरू असल्याने यंदाची थर्टी फर्स्ट जंगी होणार आहे. पनवेल तालुक्यात अनेक फार्म हाऊस आहेत. या फार्म हाऊसचे यापूर्वीच बुकिंग झालेली आहे. थर्टी फर्स्ट च्या दिवशी अनेक जण फार्म हाऊसमध्ये जाऊन मौज मजा करतात. आणि नववर्षाचे स्वागत करतात. पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्नल, शिवशंभो नाका पनवेल, वडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी



नाकाबंदी करण्यात येणार आहे.

पनवेल तालुका पोलिसांतर्फे २ पीआय, ८ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण 58 पोलीसांचा वॉच राहणार आहे तर पनवेल वाहतूक शाखेचे तीन ऑफिसर आणि २० स्टाफ यावेळी विविध ठिकाणी हजर राहणार आहेत. मद्यपींमुळे इतरांच्या जीवाला धोका असतो. मदय प्राशन करून वाहन चालवल्याने अपघात होण्याची शक्यता असते तसेच वाहन दुसऱ्या वाहनाला धडकून मोठा अपघात होऊ शकतो आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास दहा हजार रुपयाचा दंड आहे. त्यामुळे वाहन चालवताना मदय प्राशन करून वाहन चालवू नका असे आवाहन करण्यात येत आहे.

# मोबाईलपासून मुलांना वाचवा : महेंद्रशेठ घरत

## ओमकार वाचनालयाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** "वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते, ते खरे आहे. महाविद्यालयीन जीवनात मी लायब्ररीत बसून अनेक पुस्तकांचा फडशा पाडला. त्यामुळे साहजिकच वाचनाची गोडी लागली. आजही सर्व वृत्तपत्रे आणि विमान प्रवासातही पुस्तके वाचतो. चौकमध्ये १९२० पासून वाचनालय सुरू आहे. वाचनालय सुरू करून त्याला १०६ वर्षे झालीत. वाचनालयाला ऐतिहासिक वारसा आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. आज तुपगावमध्ये ओमकार वाचनालय व ग्रंथालय सुरू करून आपण एक उत्तम काम केले आहे. त्याबद्दल सर्वांचे




अभिनंदन. आज जमाना बदललाय, त्यामुळे कालानुरूप डिजिटल लायब्ररीही हवी. समाजाचे आपण देणे लागतो, त्यानुसार मी काम करतो. जिथे गरज तिथे मी सहकार्य करतोय. आपल्या ताटातील अर्धी भाकर देण्याची दानत हवी. जेवढे वाचाल तेवढे आपण प्रगल्भ होतो. मी विचारांची लढाई लढतोय. जे जे चांगले करता येईल ते ते करा, पसायदानात ज्ञानेश्वर माऊलींनी जगाच्या कल्याणाचा विचार केलाय. अलीकडे मोबाईलमुळे लाईफस्टाईल बदलली आहे. घरातील महिलाही लहान मूल रडतेय म्हणून हातात मोबाईल देऊन त्याला गप्प बसवण्याचा प्रयत्न करतात. हे अत्यंत चुकीचे आहे, कारण मोबाईलच्या स्क्रीनमुळे लहान मुलांच्या डोळ्यांवर गंभीर परिणाम होतो. तसेच ते लहान मूल पुढे हट्टी होऊन हातात मोबाईल असल्याशिवाय काही खात-पित नाही. त्यामुळे मुलांना मोबाईलपासून वाचवा," असे आवाहन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी तुपगाव-चौक येथे केले. त्यांच्या हस्ते ओमकार वाचनालय व ग्रंथालयाचे रविवारी (ता. २८) उद्घाटन झाले. यावेळी वाचनालयाच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांचा सन्मान करण्यात आला. ते पुढे म्हणाले, "पुस्तके ही काळाची गरज आहे, वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आपण हाती घेतलेला उपक्रम उत्तम आहे. त्यामुळे ५१ हजारांची मदत पुस्तकांसाठी करतोय. आपणास हवी ती विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी पुस्तके खरेदी करा."

माजी सरपंच शांताराम भधे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, काँग्रेसचे युवा अध्यक्ष निखिल ढवळे, तालुका अध्यक्ष देविदास म्हात्रे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, उद्योजक आप्पा देशमुख, विनोद भोईर, दिनेश गावडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश मागावकर यांनी केले.

# ‘मिनी मंत्रालय’साठी राजकीय पक्ष प्रबळ उमेदवारांच्या शोधात

## विधानसभेनंतर पुन्हा एकदा तालुका राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** विधानसभा निवडणुकीनंतर आता सोयगाव तालुक्याच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला असून,तालुक्याच्या ‘मिनी मंत्रालय’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समिती व तालुका स्तरावरील सत्ताकेंद्रांवर वर्चस्व मिळवण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रबळ, प्रभावी व जनाधार असलेल्या उमेदवारांच्या शोधात पक्षनेतृत्व सक्रिय झाल्याचे चित्र आहे.तालुक्यातील विविध राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत बैठका, आढावा बैठकांचे सत्र,गटबाजी व समीकरणांची जुळवाजुळव सुरू असून, विधानसभा निवडणुकीतील यश–अपयशाचा अभ्यास करून नव्या रणनीती आखल्या जात आहेत. काही ठिकाणी जुन्या चेहऱ्यांना पुन्हा संधी द्यावी की नव्या, तरुण व आक्रमक नेतृत्वावर विश्वास ठेवावा, यावर पक्षांतर्गत चर्चा रंगताना दिसत आहेत.सोयगाव तालुक्यात पंचायत समितीचे अधिकार, विकासनिधीचे नियंत्रण, प्रशासकीय प्रभाव व स्थानिक राजकारणावर होणारा परिणाम पाहता ‘मिनी मंत्रालय’वर सत्ता मिळवणे हे सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेचे मानले जात आहे. त्यामुळे स्थानिक पदाधिकारी, माजी सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व प्रभावशाली नेते हे इच्छुक उमेदवार म्हणून पुढे येत असून, काहींनी आधीपासूनच मतदारांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. राजकीय जाणकारांच्या मते, यावेळी सोयगाव तालुक्यात बहुरंगी लढत पाहायला मिळण्याची शक्यता असून, जातीय समिकरण, स्थानिक प्रश्न, विकासकामांचा लेखाजोखा आणि संघटनात्मक ताकद हे मुद्दे निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे आगामी काळात सोयगाव तालुका पुन्हा एकदा राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.भाग एक व दुसऱ्या भागात कोणत्या पक्षांची किती ताकद, जुन्यांना संधी, नवीन चेहरा चान्स, कोणाची ताकद किती..... पहा दुसऱ्या भागात.......

## सौ.प्रीतमताई पाटील ह्या तिसऱ्यांदा नगरसेविका म्हणून विजयी




**दैनिक युवक आधार**

**कपिल पाटील/पेण प्रतिनिधी :** आताच झालेल्या पेण नगर परिषदेचा निकाल हा एकतर्फी झाल्याने भाजपच्या सौ.प्रीतमताई पाटील ह्या तिसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आल्या. पेण मतदार संघात मा.आमदार श्री. रविशेठ पाटील हे भाजपचेच आमदार असल्याने पेण - पाली मतदार संघात आमदारांचे वर्चस्व आहे. पुढील निवडणूक ही जिल्हापरिषद असून पेण खारेपाट विभागातील वाशी वडखळ मतदार संघातून आपल्या मातीतीलच उमेदवार हवा अशा प्रकारचा आवाज पेण खारेपाट विभागातील सर्व सामान्य जनतेतून होत आहे.तसेच खारेपाट विभागातील जनतेच्या हितासाठी काम करणारे सर्वसामान्य जनतेच्या मनातील ताईत हे वाशी विभागातील श्री.मिलिंद पाटील याचा नाव घेण्यात येत आहे. त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी पेण खारेपाट विभागातील सर्वसामान्य जनतेने आज रविवार दिनांक २८/१२/२०२५ रोजी वाशी वडखळ मतदार संघातून आमच्याच मातीतला शिलेदार हवा अशी गर्जना करण्यासाठी खारेपाट मतदार संघ एकत्रित येत आहे.सर्वसामान्य मनातील लाडके श्री.मिलिंद पाटील यांनी सर्वसामान्य जनतेच्या मनातील इच्छा समजून घेऊन जिल्हापरिषद निवडणूक लढविण्याचा निर्धार पक्का केला आहे ह्या मेळाव्यासाठी पेण मिलिंद मोकल,सारिका पाटील,मेघा पाटील,वंदना पाटील,सूर्यकांत पाटील,व्हि बी सर तसेच प्रत्येक गावातून आलेले आजी माजी सरपंच,उपसरपंच,सदस्य व ज्येष्ठ श्रेष्ठ उपस्थित होते.

# डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया – नागपूर शाखा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/ नागपूर :** डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया, नागपूर शाखेतर्फे "सिनर्जी समिट: कार्डिओ–रिनल–डायबेटीस" या विषयावर एक व्यापक निरंतर वैद्यकीय अध्ययन (कंटिन्युइंग मेडिकल एज्युकेशन) कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे करण्यात आले. या कार्यक्रमात मधुमेह तसेच त्यासोबत उद्भवणाऱ्या हृदयविकार व मूत्रपिंड विकारांच्या एकात्मिक व बहुवैद्यकीय व्यवस्थापनावर भर देण्यात आला. नागपूर व परिसरातील फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट, एंडोक्रायनोलॉजिस्ट, कार्डिओलॉजिस्ट आणि नेफ्रोलॉजिस्ट यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

वैज्ञानिक सत्रांचे संचालन डॉ. गुंजन दलाल व डॉ. योशिता तलमले यांनी केले. सत्रांच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. शंकर खोब्रागडे, डॉ. रवी वाघमारे व डॉ. संदीप खारकर होते. शैक्षणिक चर्चांची सुरुवात डॉ. आर. बी. कळमकर यांनी सादर केलेल्या टाइप १ डायबेटीस मेलिटसच्या रंजक



क्लिनिकल केसमुळे झाली. त्यानंतर डॉ. निर्मल जैसवाल यांनी डायबेटिक किटोॲसिडोसिसमध्ये इलेक्ट्रोलाइट असंतुलन व ऑस्मोलॅलिटी यावरील सखोल व्याख्यान देत त्याचे न्यूरोलॉजिकल परिणाम स्पष्ट केले.

डॉ. नितीन वडस्कर, अध्यक्ष, डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया, नागपूर शाखा यांनी उपस्थितांचे स्वागत करत सर्वांगीण मधुमेह उपचारांसाठी बहुवैद्यकीय समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. मागील महिन्यात निधन पावलेले ज्येष्ठ वैद्य व संघटनेचे सक्रिय सदस्य कै. डॉ. नानक तोलानी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या कुटुंबीयांच्या व सर्व माजी अध्यक्षांच्या उपस्थितीत त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून एक मिनिट मौन पाळण्यात आले.

मधुमेहाच्या क्लिनिकल व्यवस्थापनावर आधारित मार्गदर्शक तत्त्वांवरील व्याख्यान डॉ. गिरीश परमार (मुंबई) यांनी दिले. त्यानंतर डॉ. सुनील अंबुलकर, डॉ. संकेत पेंडसे व डॉ. संजय जैन यांच्या सहभागाने सजीव पॅनेल चर्चा झाली.

शस्त्रक्रिया व क्रिटिकल केअर यांसारख्या आव्हानात्मक परिस्थितींमध्ये मधुमेह व्यवस्थापनावर केंद्रित एंडोक्रायनोलॉजी पॅनेल चर्चा डॉ. एस. एन. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली, ज्यास उपस्थितांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

मधुमेहाशी संबंधित कार्डिओ-मेटाबोलिक पैलूंवर डॉ. समीर श्रीवास्तव (नवी दिल्ली) यांनी डायबेटीस असलेल्या रुग्णांमधील हार्ट फेल्युअरच्या आधुनिक औषधोपचारांवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर HFrEF व HFpEF असलेल्या डायबेटिक रुग्णांच्या उपचार पद्धतींची तुलना करणारी कार्डिओलॉजी पॅनेल चर्चा डॉ. जय देशमुख यांच्या संयोजनाखाली झाली.

मधुमेहामुळे होणाऱ्या मूत्रपिंड विकारांवर डॉ. रितेश कौंटिया (कोलकाता) यांनी डायबेटिक नेफ्रोपॅथीच्या व्यवस्थापनावर सविस्तर व्याख्यान दिले. पुढे डायबेटिक किडनी डिसीजसाठी बहुवैद्यकीय केअर मॉडेलवर आधारित नेफ्रोलॉजी पॅनेल चर्चा डॉ. स्वप्ना खानझोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कार्यक्रमाचा समारोप डॉ. पूजा जाधव, सचिव यांनी आभार प्रदर्शनाने केला. हा शैक्षणिक कार्यक्रम त्याच्या व्यावहारिक व पुराव्यावर आधारित दृष्टिकोनासाठी सर्वत्र प्रशंसित ठरला. १०० हून अधिक नोंदणीकृत प्रतिनिधींनी या कार्यक्रमास उपस्थिती लावली व त्यांना २ महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC) क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात येणार आहेत.

## असोला त्रिरत्न बुद्ध विहारात बुद्ध मुर्तिची प्रतिष्ठापना

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** भारतीय बौद्ध महासभेच्या ग्राम शाखा असोला च्या वतिने त्रिरत्न बुद्ध विहारात तथागत भगवान गौतम बुद्ध बुद्ध मूर्तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष माधवराव हिवाळे होते. प्रथम पुज्य. भंतेजी उपाली थेरो,भंतेजी गौतम रत्न थेरो, भन्ते धम्म बोधी थेरो,भंते संघबोधी थेरो,भंते बुद्धरत्न यांच्या हस्ते बुद्ध मुर्तिची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

तसेच मानवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित बौद्ध उपासक ,उपासिकांनात्रिशरण ,पंचशील दिले.नंतर भिक्खू संघाचे स्वागत ,वंदन करून चीवर दान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे सुद्धा स्वागत करण्यात आले. उद्धव राव वानखेडे ,मूर्तीकार आयु.भिमराव भगत यांचाही सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक हरिश्चन्द्र पोफळे यांनी बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान



गौतम बुद्ध पुतळे, मूर्ती या संबधीत आचारसहिता पाळावी ,आकार,चेहरा मांडणी इत्यादी माहिती सांगितली व तसेच आयोजकांना शुभेच्छा दिल्या शालिग्राम पठाडे जिल्हाउपाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा यांनी त्यांच्या भाषणात विहारात दर रविवार ला ,दर पौर्णिमेला व इतर महत्वाच्या दिवशी विहारात त्रिशरण-पंचशील घ्यावे विहारांचे पावित्र्य जपण्यासाठी निर्व्यसनी पणाने आचरण करावे. प्रा. रंगनाथ धांडे जिल्हा महासचिव वंचित बहुजन आघाडी यांनी सुद्धा मार्गदर्शनात बुध्द कालीन वज्जी लोकांचा आदर्श घेऊन समाजात एकजुटीने राहावे कोणतीही संकट समाजावर आले तर ते आपण एकजूट असल्याने परतवु. महेश तिडके तालुकाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी यांनी सुद्धा आजच्या राजकिय परिस्थितीत समाजाने,स्वाभिमानी व एकनिष्ठ ,एकोप्याने राहून सतेचे सोपान चढावे. संध्याताई पंडित विभागीय संघटीका यांनी महिलांनी अंधश्रद्धा सोडुन विज्ञान वादी धम्माचा अंगिकार करावा.असे सांगितले,माधवराव हिवाळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबाविषयी माहिती समाजासाठी त्याग सांगितला

रामजी बानकर कंपनी कमांडर, समता सैनिक वाशिम, यांनी या कार्यक्रम नियोजनासाठी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत ,प्रदिप खंडारे, संपादक प्रकाश गर्जना, सदानंद गायकवाड शहर अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, जियाऊर खान शहर महासचिव वंचित बहुजन आघाडी ,मीलनताई बनसोड जिल्हा महिला पदाधिकारी, शुद्धोमती सुर्वे केंद्रिय धम्म शिक्षिका , वामन इंगोले, नारायण मोरे,सुरेश मोरे,दौलत मोरे,सुखदेव मोरे,भगवान मोरे,दिलीप मोरे,नितिन मोरे,मोहन मोरे,मुरलीधर मोरे, आशाबाई मोरे,गीताबाई मोरे,लंकाबाई मोरे,कावेरी मोरे,शांताबाई मोरे,रामकोर मोरे,जनाबाई मोरे,रत्नमाला मोरे,दुर्गाबाई मोरे,अनिता मोरे,भाग्यश्री मोरे,ज्योती मोरे,चंद्रभागा मोरे,गौकर्णा मैंदकर ,गौकर्णा मोरे, व बहुसंख्येने उपासक, उपासिका उपस्थित होते. शेवटी पुज्य भंतेजी उपाली यांनी धम्मदेसना दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन मोरे,व आभार प्रशांत मोरे यांनी मानले शेवटी सरणातय घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली

## आरोग्य हा मूलभूत हक्क मान्य न केल्यास महाराष्ट्रात जनआंदोलन – अशोक जाधव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राज्यात आरोग्य सेवा कोलमडली असून खासगीकरणामुळे सामान्य नागरिकांना उपचारांसाठी प्रचंड आर्थिक भार सहन करावा लागत आहे. गरीब, कष्टकरी, कामगार वर्गाला वेळेवर व परवडणारी आरोग्यसेवा मिळत नसल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. आरोग्य हा मूलभूत हक्क म्हणून सरकारने मान्य करावा, या मागणीसाठी महाराष्ट्रभर जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा म्युनिसिपल मजूर युनियन, मुंबईचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी दिला आहे.

२०२०–२१ या काळात आरोग्य सेवेसाठी सरकारने हजारो कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले जाते, मात्र प्रत्यक्षात आजही शासकीय रुग्णालयांमध्ये पुरेशा सुविधा,




मनुष्यबळ आणि औषधांचा अभाव आहे.

खासगी रुग्णालयांमधील अवाजवी दरांमुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः उध्वस्त होत आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा ही केवळ बाजारपेठेच्या हाती न देता सरकारने जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आरोग्य सेवा सर्वसामान्यांसाठी मोफत व सर्वसमावेशक असावी, शासकीय रुग्णालये बळकट करावीत, कंत्राटी व तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, तसेच आरोग्य क्षेत्रातील भ्रष्टाचार थांबवावा, या प्रमुख मागण्या युनियनने मांडल्या आहेत.

या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर कामगार, कर्मचारी व नागरिकांना सोबत घेऊन राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशाराही म्युनिसिपल मजूर युनियनने दिला आहे.

## उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची आढावा बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची आढावा बैठक रविवार, २८ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह, डाऊरनगर, उरण येथे नवनियुक्त शिवसेना जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. यावेळी घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा या संकल्पनेतून शिवसेना संघटना अधिक मजबूत करणे गरजेचे असल्याचे विनोद साबळे यांनी सांगितले.या बैठकीस शिवसेनेचे जिल्हा, तालुका, शहर, विभाग, शाखा तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत मेघा दमडे (जिल्हा संघटिका – महिला आघाडी), महेंद्र पाटील (जिल्हा संघटक), प्रितम सुर्वे (युवासेना जिल्हाप्रमुख), मनोज घरत (युवासेना मावळ लोकसभा प्रमुख), समद भोंगळे (अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख), ताफज्जूल फसाट अल्पसंख्यांक उपजिल्हाप्रमुख,



रमेश म्हात्रे उरण विधानसभा संपर्कप्रमुख, प्रणाली म्हात्रे महिला उरण तालुकाप्रमुख तृप्ती घरत महिला उरण उप तालुकाप्रमुख, चंद्रकांत पाटील उरण तालुका संघटक, सुलेमान शेख उरण शहरप्रमुख, संदीपजी वायंगणकर उलवे शहरप्रमुख, अक्षय म्हात्रे चाणजे जि. प. विभागप्रमुख, बेबीताई पाटील चाणजे महिला विभागप्रमुख, योगेश लीगल सेल अध्यक्ष, सचिन पाटील शिवसेना समनव्यक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस नवनियुक्त जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांनी आपल्या-आपल्या भागातील नागरी समस्या, स्थानिक युवकांना नवीन विमानतळ व औद्योगिक प्रकल्पांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच पक्षसंघटना अधिक बळकट करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा या संकल्पनेतून शिवसेना संघटना अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. स्थानिकांच्या प्रश्नांसाठी शिवसेना सदैव रस्त्यावर उतरेल, तसेच कोणत्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांना अडचण आल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. शिवसेना सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. या मार्गदर्शनामुळे उपस्थित सर्व शिवसैनिकांमध्ये नवा उत्साह संचारला असून संपूर्ण सभागृहात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या बैठकीस उरण, उलवे, करंजाडे, चिरनेर, चाणजे, केगाव, खोपटे, द्रोणागिरी आदी भागांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## राष्ट्रीय खेळाडू पै.बाळासाहेब शेंदुरकर यांना गंगाई बाबाजी क्रीडारत्न हा मानंकित पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**बाळासाहेब रकटाटे/आष्टी प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील क्रीडाक्षेत्रात खेळाडू, क्रीडा संघटक म्हणून गगन भरारी घेतलेले पै बाळासाहेब शेंदूरकर यांना २०२५ चा नामांकित गंगाई बाबाजी पुरस्कार जाहीर झालेला आहे. शालेय शिक्षणापासून त्यांनी खेळ जोपासला आणि महाराष्ट्रातील जवळपास अनेक मैदानं गाजवलेले आहेत. शेंदुरकर सर हे ३१ वर्षे झाले शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. क्रीडा क्षेत्रात कुस्तीखेळ खेळण्यास त्यांनी इयत्ता तिसरीत शिक्षण घेत असताना वयाच्या नव्या वर्षापासून सुरुवात केली होती. चाळीस वर्षात त्यांनी खेळाडू, क्रीडा संघटक, आयोजक म्हणून प्रचंड कार्य केलेले आहे. शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी त्यांनी राजा हरिश्चंद्र सामाजिक प्रतिष्ठान ची स्थापना २००३ साली केली. त्यांचे क्रीडा व सामाजिक क्षेत्रावर सात पुस्तके मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित झालेले आहेत. धोंडे कॉलेज कडा येथे शिक्षण घेत असताना छ. संभाजीनगर येथे त्यांनी ११९९३ ते ९५ सतत ३ वर्षे पंधराशे मीटर, पाच हजार मीटर, दहा हजार मीटर धावणे स्पर्धांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठा मध्ये सात जिल्ह्यांमध्ये वर्चस्व गाजवत प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हा परिषद विभागीय अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धेत १०० मीटर ,२०० मीटर, ४०० मीटर मध्ये प्रथम क्रमांक पटकावून बीड जिल्हा परिषदेला सर्वसाधारण विजेतेपद मिळवून दिले होते. ॲथलेटिक्स मध्ये महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून दिल्ली,भोपाळ, जयपुर, कोटायम येथे राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले आहेत, अनेक राज्यस्तरीय स्पर्धा मध्ये



ते सहभागी होऊन क्रमांक पटकावलेला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंना त्यांनी आर्थिक मदत केली. त्यांच्या आकाशवाणी व टीव्ही चॅनलला अनेक क्रीडाविषयक मुलाखती प्रसारित झालेल्या आहेत. बीड जिल्ह्याचे महान खेळाडू धावपटू दोनदा ऑलिम्पिक मध्ये सहभागी झालेला अविनाश साबळे त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय डीवायएसपी पै.राहुल आवारे, त्याचबरोबर पैलवान महाराष्ट्र केसरी सईद चाऊस पै. शिवाजी केकान आंतरराष्ट्रीय पैलवान सनी फुलमाळी, महिला पैलवान सोनाली तोडकर राष्ट्रीय चॅम्पियन अतिश तोडकर सर अनेक मल्लांच्या खेळाडूंच्या संपर्कात राहून त्यांनी सातत्याने मार्गदर्शन, स्पर्धा आयोजन,तांत्रिक समितीवर त्यांनी कार्य केलेले आहे. जिल्हा कुस्तीगीर संघ बीडच्या कार्याध्यक्ष पदावर कार्यकरत आहेत. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट क्रीडा संघटक बीडचा पुरस्कार त्याचबरोबर शिवशंभो क्रीडारत्न पुरस्कारही त्यांना प्राप्त आहे. शब्दगंध साहित्यिक परिषदेचे आष्टी तालुक्याचे अध्यक्ष आहेत त्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे गंगाईबाबाजी पुरस्कार जाहीर झालेला आहे.अनेक, विद्यार्थी, नेते अधिकारी,खेळाडू नातेवाईक, शिक्षक,पत्रकार बांधव यांनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केलेला आहे.शेवटी त्यांनी गंगाई बाबाजी पुरस्कार निवड समितीचे आभार व्यक्त केले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# महागाव नगरपंचायतीचा घरकुल घोटाळा

## जनता दरबारातून कथित गैरकारभाराचा नागरिकांचा संताप, सौ.जयश्री नरवाडे यांचे पुराव्यांसह आरोप

**दैनिक युवक आधार**

**मनोज उर्फ एम.डी.सुरोशे / महागाव (यवतमाळ) :** जनता दरबाराला अध्यक्षस्थानी रामराव पाटील नरवाडे होते

महागाव नगरपंचायतीच्या

कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, शहरात आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात कथित भ्रष्टाचार, अनियमितता व महाघोटाळ्यांचे आरोप जोरदारपणे मांडण्यात आले. घरकुल योजना, स्ट्रीटलाइट, पाणीपुरवठा, बांधकाम परवाने तसेच देशी दारूच्या भट्टीसाठी दिल्या जाणाऱ्या नाहरकत प्रमाणपत्रावरून ( एन . ओ .सी .) हा जनता दरबार चांगलाच गाजला. यावेळी शहरातील अनेक नागरिक, महिला, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वक्त्यांनी सांगितले की, २०१५ साली यवतमाळ जिल्ह्यात महागावसह अनेक नगरपंचायती अस्तित्वात आल्या. इतर नगरपंचायतींमध्ये विकासात्मक कामे आणि मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा दिसून येत असताना, महागाव शहराचा विकास मात्र गेल्या दहा वर्षांत ठप्प असल्याचे चित्र आहे. या काळात सत्तेची सूत्रे कोणाच्या हातात होती आणि प्रत्यक्षात शहरासाठी



कोणती कामे झाली, याचा जाब जनतेने सत्ताधाऱ्यांना विचारावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रभाग क्रमांक १ मध्ये राजकीय दबावाचा वापर करून नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करण्यात आला. गरज नसताना काही कामे सुरू करण्यात आली असून, पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतरच घाईघाईने कामे पूर्ण केली जात असल्याचे निदर्शनास आणले. काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या वायरिंग कामाचे बिल नेमके कधी काढण्यात आले, याची स्पष्ट माहिती नगरपंचायत कार्यालयाकडून मिळत नसल्याचे सांगण्यात आले. काम बोगस नसेल, तर माहिती द्यायला काय हरकत आहे असा थेट सवाल जयश्री संजय नरवाडे यांनी जनता दरबारात उपस्थित केला. नगरसेवकांनाच माहिती मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांना माहिती मिळणे अशक्य असल्याची टीकाही करण्यात आली.

शहरातील पाणीपुरवठा योजनेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले. प्रत्येक प्रभागात बोरवेल असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात अनेक प्रभागांमध्ये परिस्थिती वेगळी आहे. प्रभाग क्रमांक ११, १२ व १६ मधील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही बोरवेलवरून जुन्या गावातील सुमारे अर्ध्या भागाला पाणीपुरवठा केला जात असल्याचे सांगण्यात आले. तर प्रभाग क्रमांक १२ मध्ये पाईपलाईन व कॉक दुरुस्तीसाठी नागरिकांना स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला. शासकीय योजनांतून निधी उपलब्ध असताना नागरिकांवर आर्थिक भार टाकणे अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.स्ट्रीटलाइट घोटाळ्याबाबत उपस्थितांनी तीव्र संताप व्यक्त केला. शहरातील कोणत्याही प्रभागात आजपर्यंत पुरेशा प्रमाणात स्ट्रीटलाइट बसवण्यात आलेल्या नाहीत, मात्र या कामाची सर्व बिले आधीच काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. कामाची गती अत्यंत संथ असून दर्जाही निकृष्ट असल्याचे सांगण्यात आले. माहिती मागितली असता टाळाटाळ करून वेळकाढूपणा केला जात असल्याचेही नमूद करण्यात आले. वार्ड क्रमांक १६ मध्ये सिमेंट रपट्याचे केलेले काम त्याचे आणखीन बिल सुद्धा काढले नाही ही एक शोकांतिका आहे

देशी दारूच्या भट्टीसाठी परवानगी देण्यामागे नगरपंचायतीचा डाव असल्याचा आरोप करत, यासाठी बोगस दस्तावेज तयार केल्याचे गंभीर आरोप जनता दरबारात करण्यात आले. तसेच घरकुल योजनेंतर्गत मोठा घोटाळा झाल्याचा दावा करत अनेक लाभार्थ्यांना अद्याप बांधकाम परवाने मिळाले नसल्याचे सांगण्यात आले. एका दिवसात सीओच्या वेगवेगळ्या सह्या व दोन वेगवेगळे सीओ दाखवण्यात आल्याने संशय अधिक गडद झाला आहे. नगरपंचायत चे कर्मचारी अतिशय मुजोर झाले आहेत सर्वसामान्य जनतेचे विना पैशाचे काम करायला तयार नाहीत त्यामुळे या कर्मचाऱ्यांची सुद्धा वागणूक व्यवस्थित नाही कर्मचाऱ्यांना शिस्त कधी लागणार व कर्मचारी घरकुल लाभार्थी महागाव शहरातील नागरिकांचे काम सुरळीत करतील का किंवा यांना शिस्त कोण लावणार हाई या जनता दरबारात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे सर्व साधारण नागरिकांचे महिला वयोवृद्ध नागरिकांचे हाल थांबवावे

यासाठी मी सदैव महागाव शहरातील नागरिकांच्या पाठीशी उभी आहे, असे स्पष्ट मत जयश्री संजय नरवाडे यांनी व्यक्त केले.

या जनता दरबारामुळे महागाव नगरपंचायत व संबंधित कर्मचाऱ्यांच्या कारभारावर पुन्हा एकदा संशयाची छाया पसरली असून, प्रशासनाने तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

जयश्री संजय नरवाडे ( नगरसेविका ) जयश्री अशोक इंगोले नगरसेविका रंजना दीपक आडे नगरसेविका सुरेश उत्तमराव नरवाडे ( मा . उपाध्यक्ष नगरपंचायत महागाव तथा नगरसेवक ) विशाल प्रकाश पांडे ( नगरसेवक ) संजय विजय नरवाडे निलेश विश्वास नरवाडे बीजेपी शहराध्यक्ष दतराव गाडबैले अनेक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

> **“ प्रभाग क्रमांक १३ मधील सुरेश बाबाराव नरवाडे यांनी संबंधित लिपिकाने बांधकाम परवाना व अभियंत्याच्या सह्यासाठी ५ हजार रुपये रोख घेतल्याचा आरोप केला. संबंधित नगरपंचायत लिपिकावर केला आहे अभियंत्याच्या सह्याही बोगस असल्याचा दावा करत त्यांनी पुराव्यानिशी हे प्रकरण जनता दरबारात मांडले.**
>
> **जयश्री संजय नरवाडे ( नगरसेविका नगरपंचायत महागाव )**

> **“ मागील सहा महिन्यांपासून कचरा उचलण्याचे टेंडर होऊनही शहरात कचऱ्याची समस्या कायम असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.दरम्यान, गरिबांसाठी घरकुल दिली आहेत, मात्र गरिबांचीच पिळवणूक थांबवावी. थकीत घरकुलाचे पैसे तात्काळ मिळावेत**
>
> **सुरेश नरवाडे ( मा . उपाध्यक्ष नगरपंचायत तथा नगरसेवक महागाव )**

---

# रेवदंडा बीच महोत्सव: स्थानिकांना डावलून शासनाचा 'राजकीय खेळ'? ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी : रायगड** जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्याच्या नावाखाली महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने रेवदंडा समुद्रकिनारी 'रेवदंडा बीच महोत्सव' आयोजित केला, मात्र स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात न घेता, एकतर्फी आणि पक्षपाती पद्धतीने हा कार्यक्रम राबवल्याने संपूर्ण परिसरात तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामस्थ, लोकप्रिनिधी आणि सामाजिक घटकांनी शासनाच्या या उपक्रमावर 'राजकारणविरहित नसल्याचा' आरोप करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.दि. २७ आणि २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत झालेल्या या महोत्सवाची पूर्वसूचना न देता, फक्त एक दिवस आधी बॅनर लावल्याने ग्रामस्थांना कार्यक्रमाची माहितीच नव्हती. उद्घाटनप्रसंगी स्थानिक आमदार उपस्थित असल्याने शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते गर्दी करून आले, मात्र भाजप उपसरपंच, बहुसंख्य ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, पत्रकार आणि पंचक्रोशीतील



मान्यवरांना आमंत्रणच देण्यात आले नाही. केवळ सरपंच प्रफुल्ल मोरे व दोन शिवसेना शिंदे गटाच्या सदस्यांची उपस्थिती होती. "हा शासनाचा कार्यक्रम की शिंदे गटाचा? पक्षनिरपेक्षता कुठे?" अशा प्रश्नांनी रेवदंडा खळबळ उडाली आहे.स्टॉल वाटपातही बाहेरील व्यावसायिकांना प्राधान्य देत स्थानिकांना अल्प संधी दिल्या, ज्यामुळे आर्थिक लाभाऐवजी तोटा झाल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. कार्यक्रमाचे संकल्पनाकार आर्यन देसाई यांनी ग्रामसभेत माहिती दिली होती, तेव्हा स्थानिकांनी रूपरेषा स्पष्ट करण्याची मागणी केली होती. मात्र, ग्रामसभेतील सूचनांकडे दुर्लक्ष करून प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेतला. शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने स्थानिकांना डावलले, राजकारण घुसवले आणि जनतेच्या पैशांचा अपव्यय केल्याचा रेवदंड्यांचा आरोप आहे.

"कोकणात कार्यक्रम घ्यायचा म्हणून घेऊ नये. किती खर्च झाला, ते लेखी सांगा! खरंच तेवढाच पैसा गेला का?" असे प्रश्न उपस्थित करत सांस्कृतिक सचिव डॉ. किरण कुलकर्णी व प्रधान सचिव विकास खारगे यांच्याकडे लक्ष वेधले जात आहे. अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

---

# श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांचा वाढता ओघ; वाळूत घुसणारी वाहने, प्रशासन मात्र निष्क्रिय

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यात नाताळ व वर्षअखेरीच्या सुट्ट्यांमुळे पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असताना, प्रशासनाचा ठळक निष्काळजीपणा समोर येत आहे. तालुक्यातील विविध ठिकाणी पर्यटकांच्या वाहनांमुळे अपघातांच्या घटना वाढल्या असून, काही जणांना किरकोळ जखमा तर काहींना आपला जीवही गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अलीकडेच घडलेल्या एका घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पोलिसांच्या वाहनाला घेराव घालत वाहनाच्या काचांवर हाताने फटके मारल्याचा प्रकार घडला. एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही प्रशासन अजूनही पुरेसे जागे झालेले दिसत नाही, हे विशेष.

समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांकडून वाहने थेट वाळूत नेली जात असून, यामुळे




अपघाताचा धोका वाढला आहे. मात्र, याकडे प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन कारवाई करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नियमभंग झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा, असे प्रकार होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे अधिक आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे. प्रशासनाने तयार केलेली नियमावली केवळ कागदापुरती मर्यादित न राहता ती प्रभावीपणे अंमलात आणली पाहिजे, अशी मागणी होत आहे.

श्रीवर्धन तालुक्यात येणारा पर्यटक हा प्रामुख्याने मौजमस्तीच्या उद्देशाने येतो. मात्र, तालुक्यातील नियम, वाहतूक व्यवस्था व समुद्रकिनाऱ्यावरील निर्बंध यांची माहिती देण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे प्रत्येक प्रमुख ठिकाणी नियमांची माहिती देणारे फलक व बॅनर लावून व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याची गरज नागरिक व्यक्त करत आहेत.

तसेच, हॉटेल व्यावसायिक, रिसॉर्ट मालक व स्थानिक दुकानदार यांना विश्वासात घेऊन त्यांच्या माध्यमातून पर्यटकांना नियमांची माहिती देण्यात यावी, अशीही मागणी पुढे येत आहे. फक्त नाक्यावर उभे राहून दंडात्मक कारवाई करणे एवढेच प्रशासनाचे काम नसून, जनजागृती करणे हे पहिले व महत्त्वाचे कर्तव्य असल्याचे नागरिकांचे ठाम मत आहे.

वेळीच ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर भविष्यात आणखी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

---

# 'गडकरी साहेब, जेवायला या आणि आमचा पूल वाचवा

## (मृत्यूचा सापळा बनलेल्या पुलासाठी यवतमाळच्या तरुणाचे मंत्र्यांना आगळेवेगळे साकडे)

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : "ज्या मार्गावरून नामदार नितीन गडकरी जाणार असतात, त्या भागातील रस्ते आणि पूल प्रशासन एका रात्रीत चकाचक करून देते," या लोकचर्चेचा आधार घेत महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथील एका तरुणाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना चक्क 'वन भोजनाचे' निमंत्रण दिले आहे. हे निमंत्रण केवळ भोजनापुरते मर्यादित नसून, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूचा सापळा बनलेल्या पुस नदीवरील पुलाची डागडुजी व्हावी, याकरिता पुकारलेला हा एक अनोखा एल्गार आहे.

हिवरा (संगम) येथील रहिवासी हरीश भीमराव कामारकर यांनी नितीन गडकरी यांना पाठवलेले हे पत्र सध्या राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. या पत्रात त्यांनी विदर्भाच्या मातीतला पाहुणचार आणि शेतातल्या गावरान मेजवानीचा उल्लेख करत गडकरींना हिवरा परिसरात येण्याचे आमंत्रण दिले आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, "साहेब, हे पत्र कोणत्याही तक्रारीसाठी नाही, तर एका प्रेमाच्या आग्रहासाठी आहे. शेतातली ताजी तुरीची आमटी, हरभऱ्याची भाजी आणि चुलीवरची गरम ज्वारीची भाकर असा





बेत तयार आहे. आपण वेळ काढून या वनभोजनाचा आस्वाद घ्यावा, ही गावकऱ्यांची इच्छा आहे."

मात्र, या निमंत्रणामागे एक अत्यंत गंभीर आणि वेदनादायी वास्तव दडलेले आहे. नितीन गडकरी हे महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील हिवरा (संगम) जवळ पुस नदीवर एका पुलाची उभारणी केली होती. हा पूल परिसरातील १० ते १५ खेड्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या पुलाचे संरक्षक कठडे तुटलेले असून पुलावर जागोजागी खड्डे पडले आहेत. पथदिव्यांचा अभाव आणि रस्त्याची झालेली चाळण यामुळे हा पूल आता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. संरक्षक कठडे नसल्याने येथे अनेक भीषण अपघात झाले असून काहींना आपले प्राणही गमवावे लागले आहेत.

स्थानिक प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने, हरीश कामारकर यांनी उपरोधिकपणे गडकरींच्या कार्यतत्परतेचा दाखला दिला आहे. "तुम्ही येणार म्हटल्यावर प्रशासन खडबडून जागे होईल. आपल्या केवळ येण्याच्या बातमीनेच या पुलाचे आणि रस्त्याचे नशीब पालटेल. रखडलेले कठडे आणि पथदिव्यांचे काम युद्धपातळीवर पूर्ण होईल," अशी भावनिक साद या तरुणाने पत्रातून घातली आहे.

एका बाजूला नितीन गडकरी देशभर रस्त्यांचे जाळे विणून 'हायवे मॅन' म्हणून ओळखले जात असताना, त्यांच्याच जुन्या कामाकडे स्थानिक प्रशासनाने केलेले दुर्लक्ष आता चव्हाट्यावर आले आहे. एका सामान्य नागरिकाला आपल्या भागातील पुलाच्या दुरुस्तीसाठी थेट देशाच्या कॅबिनेट मंत्र्याला अशा प्रकारे पत्र लिहावे लागते, हे यंत्रणेचे अपयश मानले जात आहे. आता या पत्राची दखल घेऊन गडकरी प्रशासनला काय आदेश देतात आणि या पुलाचे 'भाग्य' खरोखरच उजळते का, याकडे यवतमाळ जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> **“ "प्रशासनाला जाग येत नसेल, तर साहेबांनाच साकडं घालावं लागेल!" – हरीश कामारकर**
>
> 
>
> **या अनोख्या पत्राबाबत बोलताना हरीश कामारकर म्हणाले की, "आमच्या भागातील पुस नदीवरील पूल आज मृत्यूचा सापळा बनला आहे. संरक्षक कठडे नसल्याने निष्पाप लोकांचे जीव जात आहेत, पण स्थानिक प्रशासन सुस्त आहे. नितीनजी गडकरी साहेबांचा शब्द आणि त्यांचा दौरा म्हणजे विकासाची गॅरंटी असते, हे आम्ही ऐकून आहोत. म्हणून, तक्रार करण्यापेक्षा आम्ही त्यांना प्रेमाचं निमंत्रण दिलं आहे. साहेब जेवायला आले, तर त्यांच्या स्वागतासाठी का होईना, पण हे प्रशासन रस्ते आणि पूल नक्कीच नीट करेल. जनतेचा जीव वाचवण्यासाठी यापेक्षा वेगळा मार्ग मला दिसला नाही."**

---

# नायलॉन मांजाविरोधात कठोर कारवाईचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी नायलॉन मांजाच्या वापरावर व विक्रीवर कठोर निर्बंध घालण्याबाबत दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जिल्ह्यात व्यापक जनजागृती व कारवाईचे निर्देश दिले आहेत. नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत असून काही दुर्दैवी प्रकरणांमध्ये मृत्यूही झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता, नायलॉन मांजाचा वापर व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज असल्याचे मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

नायलॉन मांजावरील बंदीबाबत न्यायालयीन आदेशांची माहिती असूनही काही नागरिक व विक्रेते त्याचे उल्लंघन करीत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत, नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच



त्याची विक्री करणारे यांना थेट जबाबदार धरले जावे, असे निरीक्षण मा. उच्च न्यायालयाने नोंदविले आहे. तथापि, कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.या सूचनेनुसार, अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास त्याच्या पालकांवर ५० हजार रुपये दंड, तर प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाचा वापर करताना आढळल्यास त्याच्यावर ५० हजार रुपये दंड ठोठावण्याचा प्रस्ताव आहे. तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या व साठा बाळगणाऱ्या विक्रेत्यांवर प्रत्येक उल्लंघनासाठी २.५० लाख रुपयांचा दंड आकारण्याचा विचार करण्यात आला आहे.

या संदर्भात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे ५ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित दंडात्मक कारवाईविरोधात ज्यांना हरकती अथवा निवेदन सादर करावयाचे आहे, त्यांनी सदर दिवशी न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ठरावीक दिवशी कोणतीही हरकत सादर न झाल्यास, वरीलप्रमाणे दंडात्मक कारवाईस सर्वसामान्य जनतेचा आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिली आहे.

# पेण प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगता सुवर्ण वर्षाची, साक्ष आमच्या ऋणानुबंधाची

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** पेण एज्युकेशन सोसायटीचे ज्युनियर कॉलेज पेण सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी मा .खासदार धैर्यशील पाटील,मा.आमदार रवींद्र शेठ पाटील, एड.मंगेश नेने अध्यक्ष पेण एज्युकेशन सोसायटी संजय कडू कार्याध्यक्ष मानद कोषाध्यक्ष, प्रशांत ओक कार्याध्यक्ष, सुधीर जोशी मानद सचिव व पेण एज्युकेशन सोसायटीचे सर्व संचालक मंडळ तसेच प्राचार्य, उपप्राचार्य,

पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापिका यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन व दिपप्रज्वलनाने, मान्यवरांच्या स्वागता ने कार्यक्रमाची सुंदर सुरुवात झाली.शिक्षणाची पंढरी मानल्या जाणाऱ्या पेण एज्युकेशन सोसायटी संचलित ज्युनिअर कॉलेज पेण गेल्या ५ दशकांपासून हजारो विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या या कॉलेजने आज आपल्या





दैदिप्यमान प्रवासाचा सुवर्ण टप्पा गाठला.




ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातूनच नाही तर परदेशातूनही विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या हजारो माजी विद्यार्थी कॉलेज च्या आवारात एकत्र आले होते.५०वर्षाच्या प्रवासात कॉलेजला लाभलेले जेष्ठ शिक्षक ,निवृत्त कर्मचारी यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्यामुळे वातावरण अधिकच भावूक झाले.११ आणि१२ वीच्या त्या मंतरलेल्या दिवसांच्या आठवण काढत अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या वर्गांना भेटी दिल्या ज्या बाकावर बसून आयुष्याची स्वप्न पाहिले ते बाक आज पुन्हा पहाताना डोळे भरून आले. १९७५ च्या पहिल्या बॅच पासून ते आजच्या पिढी पर्यंतचे विद्यार्थी एका छता खाली आल्याने हा केवळ सोहळा नसून आठवणींचा एक "महाकुंभ" ठरला.

या सांगता समारंभा निमित्त ५० वर्षांतील स्थित्यंतराचा आढावा घेणारी चित्रफित दाखवण्यात आली .यावेळी कॉलेजच्या प्रगतीचे कौतुक व मनोगते व्यक्त करणाऱ्या स्मरणीकेचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कॉलेजने डॉक्टर, इंजिनिअर, वकिल प्रशासकीय अधिकारी तर दिलेच पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे समाजात उत्तम मूल्य जपणारे नागरिक घडवले.या सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे कॉलेज च्या प्रांगणात उभारण्यात आलेला विशेष फोटो पॉईंट ५० वर्षांपूर्वीच्या त्या काळातील शालेय गणवेशाच्या प्रतिमा वापरून हा पॉईंट तयार करण्यात आला होता. आपला तो जुना युनिफॉर्म पाहून विद्यार्थी भारावून गेले. ते फोटो पॉईंटवर आपल्या कॉलेजचा काळ पुन्हा अनुभवताना सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. सांगता समारंभाच्या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्यात रंगत आणली. कॉलेज विद्यार्थ्यांनी काही हौशी माजी विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य आणि बासरी वादन सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. कॉलेज च्या ५० वर्षाच्या प्रवासावर आधारित सादरीकरणाने जमलेल्या माजी विद्यार्थ्यांना माजी शिक्षकांना भाऊक केले.रांगोळी व चित्रप्रदर्शन देखील खुप सुंदर सादरीकरण केले होते.

या ऐतिहासिक क्षणाची आठवण म्हणून सर्व माजी विद्यार्थी आणि अतिर्थींना विशेष सुवर्ण महोत्सवी स्मृतीचिन्ह आणि स्मरणिका देऊन सन्मानित करण्यात आले. ज्या शिक्षकांनी गेल्या ५ दशकात विद्यार्थ्यांना घडवले त्या ज्येष्ठ शिक्षकांचाही गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. एकत्र बसून डबा खाण्याच्या जुन्या आठवणी स्नेहभोजनाने करून दिल्या .गप्पांची मैफल आणि जेवणाचा आस्वाद घेत माजी विद्यार्थ्यांनी हा दिवस सार्थकी लावला.

कार्यक्रमाचा शेवटचा टप्पा अत्यंत भावनिक होता. ज्या मैदानावर बालपण व्यतीत झाले ,बाकावर भविष्याची स्वप्न पाहिली,आणि शिक्षकांनी बोट धरून चालायला शिकवले त्या सर्वांचा निरोप घेताना कंठ दाटून आला आणि एकमेकांच्या हात हातात घेऊन पुन्हा एकदा भेटण्याचे वचन देत जड अंतकरणाने विद्यार्थ्यांनी शाळेचा उंबरठा ओलांडला. कार्यक्रमाचा शेवट नव्हता तर ५० वर्षाच्या एका अखंड ज्ञानयज्ञाचा सन्मान होता." शाळा सुटली पण आठवणींची पाटी अजूनही कोरीच आहे" या भावनेने हा सोहळा प्रत्येकाच्या आयुष्यातील एका अविस्मरणीय ठेवा ठरला.कॉलेज च्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या देणगिदारांचाही विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे अहवाल वाचन प्राचार्य आर एम पाटील सर, सुत्रसंचलन अथर्व घाटे,व कोमल यांनी केले.आभार सुधीर जोशी यांनी मानले.

## पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वार्ड क्रमांक 14 18 आणि 20 या ठिकाणच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली . त्यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर 1 जानेवारीला शौर्य दिनानिमित्त भीमा कोरेगाव येथे जाण्याविषयी नियोजन करण्यात आले.

यावेळी पनवेल महानगर अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहर अध्यक्ष प्रशांत सोनवणे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



महेश साळुंखे हे महाविकास आघाडीच्या व महयुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांबरोबर निवडणुकीत कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी चर्चा करीत आहेत. या निवडणुकीत एक एक मत हे उभ्या असलेल्या उमेदवारासाठी महत्त्वाचे आहे. दोन्ही गट अतिशय जोरदार तयारी करीत आहेत आणि प्रत्येक उमेदवाराचा विजय हा निसटता विजय होणार आहे . स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे प्रत्येक वार्डामध्ये थोडे थोडे कार्यकर्ते आहेत आणि हे कार्यकर्ते आणि मतदार हे उमेदवाराला विजयापर्यंत नेऊ शकतात .

परंतु जो आम्हाला सन्मानपूर्वक वागणूक देईल त्याच गटाला आम्ही जाहीर पाठिंबा देऊ असे महेश साळुंखे यांनी जाहीर केलेले आहे आणि त्या दृष्टिकोनातून त्यांची वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. लवकरच ते आपला पाठिंबा कोणत्या गटाला आहे हे पत्रकार परिषद घेऊन जाहीर करणार आहेत.

## पारवा पोलिसांची मोठी कारवाई: वाळू माफियांच्या मुसक्या आवळल्या, दोन ट्रॅक्टरसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार (पोलीस निरीक्षक) हेमंत चौधरी यांच्या नेतृत्वात वाळू तस्करांविरुद्ध धडक मोहीम राबवण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांत पारवा पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवाया करून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले असून, एकूण १० लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**पहिली कारवाई: सोनखास शिवार**



दिनांक २७ डिसेंबर रोजी महसूल विभाग आणि पोलीस पथकाने संयुक्त कारवाई केली. मौजा सोनखास शेतशिवारात विनापरवाना वाळू वाहतूक करणारा एक विना क्रमांकाचा लाल रंगाचा महिंद्रा ट्रॅक्टर पकडण्यात आला. यात १ ब्रास रेतीसह ५ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी संदीप गजानन काळे आणि संजय बाबाराव लोहिकरे (दोन्ही रा. घाटंजी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईचा तपास पोहेकॉ सुरेश येलपुलवार करत आहेत.

**दुसरी कारवाई:**
दातोडी शिवार (पैनगंगा नदीपात्र)

दुसरी कारवाई २८ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजेच्या सुमारास दातोडी शिवारातील पैनगंगा नदीपात्रात करण्यात आली. यावेळी विना क्रमांकाचा स्वराज कंपनीचा (744 XT) ट्रॅक्टर १ ब्रास अवैध वाळूची वाहतूक करताना आढळून आला.

पोलिसांनी ५ लाख ७ हजार रुपये किमतीचा हा ट्रॅक्टर आणि वाळू जप्त केली आहे. या प्रकरणी विशाल महादेव निंबरते आणि धनंजय रामदास वारे (दोन्ही रा. वरुडभक्त, ता. आर्णि) यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोहेकॉ विशाल विठाळकर करत आहेत.

पोलीस निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पारवा पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध पुकारलेल्या या युद्धामुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

## करंजाडेत रंगला हॉलिबॉल स्पर्धेचा थरार: विविध मैदानी खेळांचे आयोजन करणे हे माझे दायित्व - प्रथमेश भास्कर पुंडे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त करंजाडे येथे छत्रपती स्पोर्ट्स क्लब यांच्या मार्फत हॉलिबॉल स्पर्धांचे आयोजन केले होते. भारतातील अनेक खेळाडूंसारखे खेळाडू करंजाडे शहरातून तयार व्हावेत या उद्देश डोळ्यासमोर ठेवून अनेक उपक्रम भविष्यात राबविण्यात येतील अशी माहिती प्रथमेश पुंडे यांनी दिली.

जागतिक ऑलिम्पिक स्पर्धेतील भारताची कामगिरी खूप निराशाजनक असते. एशियन गेम मध्येही समाधानकारक कामगिरी नसते. करंजाडे भागातील तरुणांना खेळाकडे आकर्षित करणे,राष्ट्रीय भावना,शिस्त आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली रुजविणे हा या उपक्रमातील उद्देश आहे. अटलजींच्या जीवनमूल्यांचा,विचारांचा समाजातील प्रत्येक स्तरावर प्रचार करणे,तरुणांना सक्रिय करून त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे तसेच निरोगी आणि शिस्तबद्ध समाजाच्या निर्मितीसाठी



खेळाडूंना प्रोत्साहन देणे,अटलजींच्या राष्ट्रवादाच्या विचारांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कार्याची आठवण करून देणे हा प्रमुख हेतू आहे. या स्पर्धेत 8 संघांनी सहभाग घेऊन रोमांचक कामगिरी केली. करंजाडेतील 7 आणि वांद्रे,मुंबई येथील एक संघ असे एकूण 8 संघांनी या स्पर्धेत भाग घेतला होता.

सुरुवात केलेल्या संघांनी शेवट करून प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवला. छत्रपती स्पोर्ट्स क्लब 1 आणि हॉलिडे पँथर्स या संघातील अंतिम सामना प्रचंड चुरशीचा झाला.

प्रथम द्वितीय संघाला रोख पारितोषिक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.तसेच इतर संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले व प्रविण बनकर यांना या चषकचा सर्वोत्कृष खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. सर्व संघांच्या खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले.

## सणसर भवानीनगर परिसरात डायरेक्टर गुटख्याचा तुटवडा; चढ्या भावाने विक्री करण्याचा प्रकार राजरोस चालू

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील पश्चिम भागातील सणसर भवानीनगर येथे डायरेक्टर नावाच्या गुटख्याचा तुटवडा गेली पंधरा दिवसापासून जाणवत असून विक्री करण्यासाठी गुटखा मिळत नसल्याचे ग्राहकांना विक्रेता यांच्याकडून सांगण्यात येत आहे.त्यामुळे ग्राहकांना ज्यादा दराने (ब्लॅकने) किंवा मागच्या दाराने गुटखा खरेदी करावा लागत असल्याचे गुटखा खाणारे प्रेमी सांगत आहेत.महाराष्ट्र सरकारने गुटखा आणि तंबाखू युक्त पान मसाल्यावर बंदी घातली असली तरी या बंदीचे उल्लंघन दिवसाढवळ्या सणसर भवानीनगर परिसरात होत असल्याचे चित्र दिसत आहे गुटखा विक्री करणाऱ्यां वर कडक कारवाई करण्यात येणार असा




कायदा जरी असला तरी पण या भागात राजरोसपणे गुटखा विक्री केली जात असल्याचे दिसत आहे महाराष्ट्र सरकारने तर गुटखा विक्री करणाऱ्यांवर मकोका (MOCA) लावण्यात येणार असल्याची घोषणा केली असूनसुद्धा गुटखा विक्री करणारे यांच्यावर त्याचा काहीच फरक पडत नसल्याचे दिसत आहे कारण कारवाई करणाऱ्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जपले की सगळे सुरळीत चालू राहते आणि 'तेरी भी चूप मेरी भी चूप अश्या प्रकारचे काम सध्या सुरु असल्याचे गुटखा विक्रेता सांगत आहेत.अश्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात कधी येणार असा पण सवाल जनतेला पडला आहे गुटखा बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी याभागातील अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलीस प्रशासन नक्कीच कमी पडत असल्याचे जाणवत आहे. गुटखा विक्री करणाऱ्यांवर १ वर्षाचा तुरुंगवास आणि दंड होऊ शकतो गुटखा विक्री करणाऱ्या वाहनांची जप्ती करण्यात येईल गुटखा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल व गुटखा विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल असे कायदे फक्त कागदावर आहेत का असा सवाल जनतेला पडला आहे.

दगडाच्या कठोर छातीतून वाट काढत उगवलेलं हे नाजूक झाड म्हणजे जणू जीवनाचा जिवंत संदेशच. आजूबाजूला दगड, भिंत, कोंदटपणा आणि मर्यादा असताना देखील या रोपट्याने हार मानली नाही. जिथे माती नाही, जिथे पोषण मिळणं अवघड आहे, तिथेही त्याने आपली मुळे रोवली आणि फुलण्याचं स्वप्न जपलं.

या झाडाचं प्रत्येक पान संघर्षाची साक्ष देतं. अरुंद फटीतून वर येताना त्याने अनेक अडथळे सहन केले असतील, तरीही त्याच्या हिरव्या



पानांवर थकवा नाही, तक्रार नाही. उलट त्या पानांवर आत्मविश्वास आणि जिद्द दिसते. आणि त्या सगळ्या संघर्षाच्या टोकावर उमललेलं ते जांभळट फूल—जणू सांगतं, “परिस्थिती कितीही कठीण असली तरी सौंदर्य आणि आशा उमलू शकते.”

हे झाड आपल्याला शिकवतं की संधीची वाट पाहण्यापेक्षा परिस्थितीला सामोरं जाणं महत्त्वाचं आहे. दगडातून मार्ग काढणं म्हणजे अशक्याला शक्य करणं. जीवनात अनेकदा आपल्यालाही असेच दगड भेटतात—अडचणी, मर्यादा, अपयश. पण जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल तर त्या दगडांमधूनही यशाचं फूल फुलू शकतं.

हे फूल केवळ निसर्गाचं सौंदर्य नाही, तर संघर्षातून उमललेल्या आशेचं प्रतीक आहे. शांतपणे, कुठलाही गाजावाजा न करता, ते आपल्याला एक मोलाचा धडा देऊन जातं—कधीही हार मानू नका; कारण जीवनाला मार्ग सापडतोच.

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**-अनिकेत मोहित**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ११,४६० दुबार मतदार आढळले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आगामी पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील घोळांवर अखेर पडदा पडू लागला आहे. प्रारूप मतदार यादीमध्ये २१,१६२ मतदार दुबार व बोगस असल्याच्या हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या, याची महापालिकेने सखोल छाननी केल्यानंतर तब्बल ११,४६० दुबार मतदार आढळून आले असून, या मतदारांकडून हमीपत्र घेण्यासाठी निवडणूक विभागाने प्रत्यक्ष क्षेत्रीय मोहीम हाती घेतली आहे. पुढील काही दिवसांत निवडणूक विभागाचे कर्मचारी घरोघरी भेटी देऊन संबंधित मतदारांकडून एका मतदान केंद्राची निवड निश्चित करून घेणार आहेत.पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून, १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या ५,५४,५७८ मतदारांच्या प्रारूप यादीवर २९,४०६ हरकती दाखल झाल्या होत्या. यामध्ये स्वता मतदारांनी नोंदविलेल्या ५,५२६ तर इतरांनी नोंदविलेल्या १२,८५२ हरकतींचा समावेश होता. दुबार व संशयास्पद मतदारांबाबत एकूण २१,१६२ हरकती प्राप्त झाल्या, तसेच ९४५ मृत मतदारांची नावे यादीत असल्याचाही दावा करण्यात आला होता. या हरकतीनंतर निवडणूक विभागाने सॉफ्टवेअर प्रणालीच्या मदतीने छायाचित्रांची तुलना, नावे, पालकांची माहिती आणि पत्ता यांची पडताळणी केली. ही प्रक्रिया १९ पर्यवेक्षकांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली. तपासणीनंतर ११,४६० मतदार दुबार असल्याचे स्पष्ट झाले. या मतदारांना दोनपैकी कोणत्या एका मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे, याबाबत विकल्प स्वरूपाचे हमीपत्र भरून घेतले जाणार आहे.जे मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सापडणार नाहीत किंवा माहिती देणार नाहीत, त्यांच्याकडून मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्रावर हमीपत्र घेतले जाईल. प्रभागनिहाय बीएलओ पथकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. हमीपत्र दिल्यानंतरही एखाद्या मतदाराने दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिला आहे.दरम्यान, दुबार व संशयास्पद मतदारांच्या मुद्द्यावर शिवसेना, शेकापसह विविध राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. काही प्रभागांत मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविल्या गेल्याने हा विषय चर्चेत आला होता. दोषमुक्त अंतिम मतदार यादीच्या आधारेच निवडणूक कार्यक्रम राबवावा, अशी मागणी या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली होती.

# सिल्लोड हादरले! एक कोटीच्या खंडणीसाठी व्यापाऱ्याचा काटा; पाच नराधम जेरबंद

## चाळीसगाव घाटात फेकला मृतदेह; पोलिसांकडून काही तासांतच थरारक उलगडा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील बोदवड येथील कृषी सेवा केंद्र चालक तुकाराम माधवराव गव्हाणे (५५) यांच्या अपहरणाचा शेवट अत्यंत भीषण आणि दुर्दैवी झाला आहे. केवळ पैशाच्या हव्यासापोटी एका व्यापाऱ्याचा निर्घृण खून करून त्यांचा मृतदेह घाटात फेकून दिल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अजिंठा पोलिसांनी अत्यंत कौशल्याने तपास चक्र फिरवत पाच संशयितांना छत्रपती संभाजीनगरमधून मुसक्या आवळल्या आहेत.



**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, तुकाराम गव्हाणे हे शनिवारी (२७ डिसेंबर) दुपारी आपल्या दुचाकीवरून (MH-20, GF-0443) उंडणगाव येथे गेले होते. तेथील एका व्यापाऱ्याकडून एक लाख रुपये घेऊन ते घराकडे परतण्यासाठी निघाले. मात्र, उशिरापर्यंत ते घरी न पोहोचल्याने आणि फोन बंद असल्याने कुटुंबीयांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली.

**खंडणीचा फोन आणि थरार**

दुसऱ्या दिवशी गव्हाणे यांच्याच मोबाईलवरून त्यांच्या मुलाला फोन आला. "माझे अपहरण झाले असून, बसस्थानक परिसरात एक कोटी रुपये घेऊन ये," असे त्यांनी सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा काकांना फोन करून खंडणीची रक्कम दोन कोटी करण्यात आली. या धक्कादायक फोनमुळे कुटुंबाने तातडीने अजिंठा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

**पोलिसांची गरुडझेप; तांत्रिक मदतीने शोध**

घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे, उपनिरीक्षक धम्मदीप काकडे यांच्यासह वडोदबाजार पोलीस आणि गुन्हे शाखेच्या तीन पथकांनी तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल लोकेशनच्या तांत्रिक मदतीने शोध घेत असताना, सोमवारी पहाटे चाळीसगाव घाटात पोलिसांना गव्हाणे यांचा मृतदेह मिळून आला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपींनी त्यांना घाटात फेकून दिले होते.

**पाच आरोपींच्या आवळल्या मुसक्या**

या हत्याकांडाचा छडा लावत पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून पाच जणांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये गोळेगाव येथील २ जण, पालोदवाडी येथील २ जण आणि पानवडोद येथील १ जण अशा पाच आरोपींचा समावेश आहे. या नराधमांनी गव्हाणे यांचा खून का केला आणि यामध्ये आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का? याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.या भीषण घटनेमुळे संपूर्ण सिल्लोड आणि परिसरात संतापाची लाट उसळली असून, आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी केली जात आहे



माजी उपमहापौर जगदीश गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पनवेल मधील प्रसिद्ध उद्योगपती, निर्माते दीपक मिराणी.

( दैनिक युवक आधार )

# गोमांस विक्री प्रकरणी तिसरा फरार आरोपी पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** बेकायदेशीररीत्या गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनासह पनवेल शहर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले होते. यावेळी गाडीचा चालक सराईत गुन्हेगार फरार झाला होता. त्याला अँटॉप हिल येथून पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आरोपींची संख्या ३ झाली आहे.

या गुन्ह्यामध्ये मोनिउद्दीन शेख (रा. शिवाजीनगर, गोवंडी), पासू उस्मान कुरेशी (रा. मानखुर्द) हे दोन आरोपी पूर्वीच पकडण्यात आले होते तर फरार गाडी



चालक आरोपी मोहम्मद अली अकबर अली शहा (रा. अँटॉप हिल, मुंबई) याला वपोनी नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील तुषार बोरसे, मिथुन भोसले, संदेश म्हात्रे व शशिकांत काकडे यांनी कोणतीही तांत्रिक मदत नसताना तसेच कोणतीही पूर्व माहिती उपलब्ध नसतानाही, गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कौशल्यपूर्ण तपास करून अँटॉप हिल येथून ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात मुंबई येथील विविध पोलिस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहे. त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कलम 325, 3(5) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे.

# सुरगाणा महाविद्यालयात गुरू गोविंदसिंहजी यांच्या विचारांवर वकृत्व व निबंध स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागामार्फत महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालय यांच्या परिपत्रकानुसार श्री. गुरूगोविंदसिंहजी यांच्या प्रकाशपर्वाच्या निमित्ताने सुरगाणा महाविद्यालयात श्री. गुरू गोविंदसिंहजी यांच्या विचारांवर वकृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा संपन्न झाली.

निबंध स्पर्धेत कु.स्तवन प्रकाश देठे प्रथम क्रमांक कु. हेमांगी मनोहर पडेर



द्वितीय क्रमांक तर वकृत्व स्पर्धेत कु.हेमंती नामदेव वाघमारे प्रथम क्रमांक तर विजय देवीदास शेवरे द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले .

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे,प्रा. बाळू धुम, प्रा.भगवान महाले,प्रा. सुभाष कामडी,प्रा. देवचंद कवर ,प्रा.भास्कर भगरे,प्रा. कृष्णा गांगोडे,प्रा.देवीदास सांळुखे, प्रा.पुष्पा महाले, प्रा.सागर डोंगरे, डॉ.सविता शिरसाट व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# रिसोड येथे "निसर्ग संवर्धन प्रश्नमंजुषा स्पर्धा परीक्षा" कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिंह. ठाकुर :** 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,जो कोणी प्राशन करेल तो गूरगूरल्या शिवाय राहणार नाही'असे वक्तव्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.ज्ञानी व्यक्ति हा समाजामध्ये पूजनीय असतो,नव्हे तर तो अनेक क्षेत्रामध्ये नावलौकीक सुध्दा प्राप्त करू शकतो,असे मत वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी महात्मा फुले विद्यालय रिसोड येथे सामाजिक वनिकरणं परिक्षेत्र रिसोड द्वारा आयोजित *'निसर्ग संवर्धन प्रश्नमंजूषा स्पर्धा परीक्षा'* दरम्यान परीक्षेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून व्यक्त केले. वर्ग 8,9 व 10 च्या विद्यार्थ्यांची बौध्दीक पातळी लक्षात घेता प्रश्नपत्रिकेमध्ये निसर्ग निगडीत एकूण 50 वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्यात आला. परीक्षेचे महत्व स्पष्ट करतांना मुलंगे म्हणाले की,आजची परीक्षा उद्याचे तूमचे भवितव्य निश्चित करू शकते. सद्धस्थितीत कोणत्याही शासकिय नोकरी मध्ये रूजू होण्याकरीता सर्वप्रथम वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्पर्धा परीक्षांनाच सामोरे जावे लागते कारण 10 वी व 12 वी च्या गुणपत्रिकांच्या आधारे मिळणार्या नोकर्या आजरोजी इतिहास जमा झाल्या आहेत. संपादीत केलेल्या ज्ञानाच्या आधारे सोनी टीव्ही वर प्रसारित व महानायक अमिताभ बच्चन द्वारे संचालित होणाऱ्या *"कौन बनेगा करोडपती"*



कार्यक्रमाद्वारे अनेक स्पर्धकांनी बक्षीसरूपी लाखो नव्हे तर करोडों रुपये अर्जित केले हे सर्वश्रुत आहे. सदर्हु परीक्षेमध्ये एकुण 50 परिक्षार्थींनी सहभाग नोंदविला.सहभाग नोंदविण्यार्या प्रत्येक परीक्षार्थीला प्रमाणपत्र तसेचं परीक्षेमध्ये गुणानुक्रमे प्रथम तीन येणाऱ्या स्पर्धकांना योग्य ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येईल असे परीक्षा आयोजकांनी जाहीर केले.स्पर्धा परीक्षेला यशस्वी करण्याकरीता अरविंद ईढोळे लागवड अधिकारी,निर्मला डिघोळे वनपाल,रमेश कदम वनरक्षक,प्रमोद जावळे वनरक्षक सामाजिक वनिकरण परिक्षेत्र रिसोड,विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल सारोळकर,शिक्षक वैभव इंगोले,महादेव जायभाये,राजेश वाघ,आनंदा डाखोरे,प्रताप वाकळे,सारंगधर सानप ईत्यादिंनी मोलाचे सहकार्य केले.

# श्री वृंदावन बाबा अय्यप्पा भक्तवृंदा आणि श्री वृंदावन बाबा भजन मंडळी यांच्या तर्फे २१ वि श्री श्री अय्यप्पा महापूजा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नवीन पनवेल येथील श्री वृंदावन बाबा अय्यप्पा भक्तवृंदा आणि श्री वृंदावन बाबा भजन मंडळी यांच्या तर्फे २१ वि श्री श्री अय्यप्पा महापूजा गुरुवार दि १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.या महापूजेत सकाळी ६.०० ते ७.०० वा., श्री महागणपती होम सकाळी ९.३० ते १२.३० वा., भजन कार्यक्रम (श्री वृंदावन बाबा भजन मंडळ) दुपारी १२.३० वा, महामंगल आरती त्यानंतर तीर्थप्रसाद वाटप आणि सार्वजनिक महाप्रसाद दुपारी १.०० वा, सायं. ५.०० वा., यक्षागाना बयालाटा असे कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भक्तगण या शुभकार्याला उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी व तिर्थप्रसादाचा लाभ घ्यावा अशी नम्र विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली संत स्वामी श्री वृंदावनबाबा समाधी मंदिर सेक्टर ५/ए, गुरुद्वारामागे, नवीन पनवेल (पू.) ४१० २०६.येथे ही महापूजा संपन्न होणार आहे.

# सिल्लोडमध्ये भाजपला खिंडार; दिलीप गवळींचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** सिल्लोड- सोयगाव विधानसभा मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला असून, भारतीय जनता पक्षाला मोठे खिंडार पडले आहे. भाजपचे अनुसूचित जाती-जमातीचे तालुकाध्यक्ष दिलीप गवळी यांनी आज आमदार अब्दुल सत्तार यांच्या विकासकामांवर आणि कार्यपद्धतीवर विश्वास दर्शवत आपल्या असंख्य समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

शहरातील 'शिवसेना भवन' येथे हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी




दिलीप गवळी यांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दिलीप गवळी हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय होते. मात्र, आमदार अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड-सोयगाव मतदारसंघात राबविलेले विकासाचे मॉडेल आणि सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची त्यांची हातोटी यामुळे प्रभावित होऊन आपण शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे गवळी यांनी यावेळी नमूद केले. "सत्तार साहेबांच्या नेतृत्वाखाली तालुक्याचा कायापालट होत असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी मी या पक्षात सामील झालो आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, सेवानिवृत्त विभागीय निबंधक देविदास पालोदकर, माजी पंचायत समिती सदस्य निजाम पठाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीप राऊत, संजय पा. डमाळे, पांडुरंग गवळे, अन्वीचे माजी सरपंच रमेश दांडगे, वसईचे माजी सरपंच शेषराव सनान्से यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रवेशामुळे सिल्लोड तालुक्यातील भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची ताकद अधिक वाढल्याचे मानले जात आहे.

# वाशी सिडको एक्सहिबिशन मैदानावर केमिस्ट क्रिकेट प्रीमियर लीगचा धमाल शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे प्रतिनिधी :** नवी मुंबई केमिस्ट संघटनेने सिडको एक्सहिबिशन सेंटर, वाशी येथे आयोजित केमिस्ट क्रिकेट प्रीमियर लीग – नवी मुंबई (सीझन १) चा शुभारंभ २८ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झाला. खेळाडूंच्या जोरदार जल्लोषाने मैदान दणक्यात भरले गेले, तर प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाटाने हवेत उत्स्फूर्त ऊर्जा पसरली ."मान्यवरांची प्रमुख उपस्थिती" राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार संजीव नाईक, दशरथ भगत, संदीप भगत आणि निशांत भगत यांनी दीपप्रज्वलन करून स्पर्धेचा उद्घाटन केला. खेळाडूंना सांत्वन देताना त्यांनी क्रिकेट बॉलने गेंदबाजीही करून मैदानावर उत्साह वाढवला ."मनोगते आणि संदेश " मान्यवरांनी आपल्या भाषणात अशा क्रीडा स्पर्धा व्यावसायिकांमध्ये एकोपा वाढवतात,



आरोग्यदायी जीवनशैली प्रोत्साहित करतात आणि सकारात्मक स्पर्धा भावना जागृत करतात, असे सांगितले. गणेश नाईक यांनी नवी मुंबईतील क्रिकेट संस्कृतीची प्रशंसा करत केमिस्ट बांधवांच्या एकजुटीचे कौतुक केले . "प्रेक्षकांचा प्रतिसाद कार्यक्रमाला" हजारो केमिस्ट बांधव, क्रीडाप्रेमी आणि नागरिक उपस्थित होते, ज्यामुळे वातावरण भगवा झाले. आयोजकांच्या यशस्वी नियोजनाचे सर्वत्र अभिनंदन होत असून, ही स्पर्धा नवी मुंबईतील क्रीडा महोत्सवाची नवी कहाणी लिहित आहे

## फ्रेंड्स क्लब सेलूच्या अध्यक्षपदी; विजय धोंडीबा शेरे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : फ्रेंड्स क्लब सेलूच्या अध्यक्षपदी विजय धोंडीबा शेरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा नुकतीच करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी रामेश्वर हिरामण चव्हाण यांची निवड झाली असून सचिवपदी निजलिंग विश्वनाथ तरवडगे, सहसचिवपदी विलासराव चंदरराव पाटील तर कोषाध्यक्षपदी प्रभाकर नामदेव लाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय कार्यकारिणी सदस्य म्हणून पांडुरंग गणपतराव ढवळे, जुगलकिशोर गोकुळचंद बाहेती, सुरेंद्र बन्सीलाल गिल्डा, राजेश जगदीशप्रसाद गुप्ता, संतोष शिवाजीराव खाडप आणि जगन्नाथ नागोराव पवार यांची निवड



करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून फ्रेंड्स क्लब सेलूच्या सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. अध्यक्ष विजय धोंडीबा शेरे यांच्या नेतृत्वाखाली क्लबच्या कार्यात सकारात्मक व लोकाभिमुख बदल घडतील, अशी अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली.

## कल्याण तालुक्यातील पावशे पाड्यात खंडोबाचे जागरण गोंधळ उत्सवात झाला साजरा

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर/रशीद शेख** : कल्याण तालुक्यातील पावशे पाडा हे गावं आगदी फार धार्मिक व सामाजिक इतिहासीक आहे खंडोबा देवला पारंपरिक पद्धतीने महिलांच्या हासते हाळद लावण्यात आली यावेळी सर्वच ग्रामस्थ उपस्थित राहुन जागरण गोंधळ कार्यक्रमाचे आनंद लुटला आहे पावशे पाड्यातील व परिसरातील मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या भक्ताने आपलीं हजेरी लावून मुक्ता



हस्ते भंडारा उधळला ज्यामुळे परिसर पिवळा झाला मल्हारी पिवळा झाला हळद लागली बाणायला असे संबळ आणि तुणतुणे ढोलकी वाजवत मुरुळच्या घुंगुरच्या आवाजात भक्तीगीते घुमु लागलें कल्याण तालुक्यातील हे एक पावशे पाडा अगदी सामाजिक क्षेत्रात मध्ये नावाजलेलं गाव आहे तेथील गावकरी ग्रामस्थ भाविक आहेत खंडोबाचे व मच्छिंद्रनाथ यांच्या सह अनेक मानकरी भाविकांची उपस्थिती होती खंडोबा हे लाखो भक्तांचे कुलदैवत असून हळद अर्पण ही विजय व शुभतेची उत्साह प्रथा आहे

आमचे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील व मुरमीकर यांनी नवूशे कीलु मिटर येऊन सर्वच गोंधळी ग्रुप कलावंतांनी आम्हाला आगदी मनापासून सेवा दिली असे पावशे पाड्यातील जागरण गोंधळचें संस्थापक नवरदेव नौरी आणि ग्रामस्थ गावकरी व भाविकी यांच्या वतीने कलाकार गायकांचे कौशल्य थाप मारुन आभार प्रदर्शन केले आहे

## कुडे लेणी ऑडिओ गाईड क्यू आर कोडचे भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण नवी दिल्ली चे डायरेक्टर यांच्या हस्ते उद्घाटन

### स्कॅनरद्वारे पर्यटकांना कुडा लेणी विषयी मिळणार सविस्तर माहिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नितीन लोखंडे/तळा** : रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक प्राचीन कुडा लेण्यांविषयी माहिती देणाऱ्या ऑडिओ गाईड क्यूआर कोडचे उद्घाटन भारतीय पुरातत्व विभाग नवी दिल्ली चे डायरेक्टर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भारतीय पुरातत्त्व विभाग नवी दिल्लीचे डायरेक्टर, मुंबई सर्कलचे अधीक्षक श्री. अभिजीत आंबेकर, मुरुड जंजिरा उप मंडळचे अधिकारी श्री. बजरंग येलीकर, येलीकर मॅडम तसेच कर्मचारी, पर्यटक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जंजिरा उपमंडळ चे अधिकारी श्री बजरंग येलीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मुंबई सर्कलचे अधीक्षक श्री. अभिजीत आंबेकर, यांनी भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण नवी दिल्ली चे डायरेक्टर यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.

महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यामध्ये कुडे येथील लेण्यांचा समूह एक प्रसिद्ध लेणी समूह आहे. कुडे लेणी तीन स्तरात कोरलेल्या आहेत. या लेणी समूहामध्ये अकरा पाण्याची टाकी, पाच चैत्यगृह आणि अन्यविहार आहेत. लेणी क्रमांक सहा सर्वात मोठे चैत्यगृह आहे. दुसऱ्या टप्प्यातील लेण्यांच्या समोरून पर्यटकांना राजपुरी खाडीचे विहंगमय दृश्य पहावयास मिळते. या लेण्यांची निर्मिती इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासून ते चौथ्या शतकापर्यंत केली गेली. मुंबई पुणे पासून साधारणत: दिडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या तसेच मुंबई - गोवा महामार्गावर असलेल्या इंदापूरपासून 30 किलोमीटर अंतरावर कुडे लेणी आहे. या लेणीला भेट देणाऱ्या पर्यटकांना लेण्यांविषयी माहिती मिळावी याकरिता भारतीय पुरातत्व विभागाने क्यूआर कोड स्कॅनर ऑडिओ गाईडची सुविधा हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये पर्यटकांना उपलब्ध करून दिली आहे. पर्यटकांनी क्यूआर कोड स्कॅन करून मोबाईल फोन मध्ये येणाऱ्या डॅशबोर्ड वर मोबाईल नंबर समाविष्ट करून स्टार्ट ऑडिओ गाईड या बटनावर करावे. क्लिक केल्यावर लेण्यांविषयीची सविस्तर माहिती ऑडिओ स्वरूपात मोबाईल फोनमध्ये पर्यटकांना ऐकायला मिळते.

## वर्चस्व ग्रुप भिगवण यांच्याकडून ऊसतोड महिलांना साडी वाटप

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील वर्चस्व ग्रुप हा नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही सलग 5 व्या वर्षी ऊसतोड कामगार महिलांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुतावस्ती येथील शाळेत साडी वाटप,लहान मुलांना कपडे वाटप तसेच विद्यार्थी यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले

कार्यक्रमासाठी भरणे प्रतिष्ठानच्या अनुष्का ताई भरणे भावी जिल्हा परिषद सदस्य ॲड पुजा ताई घोलप तेज पृथ्वी संस्थापक अध्यक्ष अनिता ताई खरात नगरसेवक प्रशांत मामा उंबरे नगरसेवक शुभम भैय्या पवार तंटामुक्ती अध्यक्ष दशरथ आबा भोसले डायमंड उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष अमोल दादा कोंडके पैलवान ग्रुप बारामती अध्यक्ष पै ओंकार भाऊ महाडिक माऊली पाटोळे



उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी वर्चस्व ग्रुप करत असलेल्या कार्याचा आपल्या भाषणात गुणगौरव करून खुप कौतुक केले या कार्यक्रमाचे आयोजन वर्चस्व ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष संतोष भाऊ कुताळ कार्याध्यक्ष विशाल भाऊ शिंदे गणेश कुताळ दिपक कुताळ सचिन कुताळ आदी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुर्यवंशी मॅडम व लोहार मॅडमयांनी केले तर गडकर मॅडम यांनी आभार मानले.

## धर्माबाद येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त उद्या कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी /एडके पुनम प्रकाश** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण ण दिनानिमित्त उद्या म्हणजेच ३० डिसेंबर रोजी रेल्वे स्टेशन परिसरात भव्य बुद्ध भीम गीतांचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य पी .जे. थोटे, उद्घाटक दक्षिण मध्ये रेल्वे हैदराबाद विभाग प्रमुख पि. नारायण यांच्या हस्ते होणार आहे.६ डिसेंबर रोजी होणारा महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम यावर्षी 30 डिसेंबर रोजी होत आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे संयोजकांनी पुढे घेण्याचे ठरविले होते. पहिल्या सकाळच्या सत्रात १०.५ वाजता रेल्वे स्टेशन प्रबंध आर .के. उद्या कुमार व झोनल प्रेसिडेंन्ट एक. विनोद यांच्या हस्ते ध्वजारोहण, पूजा पाठ भारतीय बौद्ध महासभा तालुका सचिव माधवराव वाघमारे कांगठीकर व डि.जी. गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे. दुसऱ्या सत्रात संध्याकाळी ६ वाजता अभिवादन सभा व प्रमुख वक्त्यांची भाषणे, तिसऱ्या सत्रात संध्याकाळी ८.३० वाजता बुलढाणा येथील सुप्रसिद्ध गायिका आशा चावरे, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका रविराज भद्रे यांच्या बुद्ध भीम गायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे संयोजक केरबा वाघमारे, निलेश वाघमारे बळीराम कांबळे, राहुल शिरसे यांनी केले आहे.

## कोयाळी (बु )येथे 2 जानेवारी रोजी भव्य समाज प्रभोधनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध खंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवन पाल महाराज यांचे दि. 02 जानेवारी 2026 रोजी भव्य समाज प्रबोधनाचे आयोजन करण्याचे योजले आहे ,गावातील व पंचक्रोशीतील सर्व समाज बांधवांनी या समाज प्रबोधन कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी कोयाळी ( बु) यांनी केले आहे, हार्मोनियम वादक गायणाचार्य प्रभाकर दादा हिवराळे, तबलावादक




राधेश्याम दादा खडसे, गायनाचार्य वाकोडे, अंकुश दादा घावट, उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे स्थळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ कोयाळी (बु) ता. रिसोड,जि. वाशिम येथे ठरले असून दि. 02 जानेवारी रोजी सायंकाळी ठीक 7 वाजता हजारोच्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी कोयाळी (बु )यांनी केले आहे

## सचिन पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा; भारत माता आश्रमातील गोशाळेत चारा दान

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : टायगर ग्रुप येवला येथील कार्यकर्ते तसेच सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असलेले सचिन दादा पाटील यांनी आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत आगळ्या-वेगळ्या उपक्रमातून साजरा केला. विंचुर ग्रामपालिका सदस्य राजू मोरे यांच्या संकल्पनेतून भारत माता आश्रम येथे जनेश्वर महाराजांच्या उपस्थितीत गोशाळेत चारा दान करून हा उपक्रम राबविण्यात आला.वाढदिवस केवळ उत्सवापुरता न ठेवता समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्याचा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

गोमातांच्या सेवेतून मानवतेची भावना वृद्धिंगत व्हावी, तसेच तरुण पिढीने सामाजिक कार्याकडे अधिक सक्रियपणे वळावे, हा या कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या



प्रसंगी राजू मोरे मित्र परिवार, रमेश सानप, योगेश गोसावी मित्र परिवार, तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सचिन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे मनापासून कौतुक केले.

समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## लोकजन शक्ती पार्टी स्वबळावर तर काही ठिकाणी महायुती सोबत राहणार : प्रमोद कुदळे प्रदेशाध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग** : नागपूर लोकजन शक्ती पार्टी रामबिलास या पक्षाचा शनिवारी 27 डिसेंबर रोजी विदर्भ हिंदी साहित्य भवन नागपूर येथे विदर्भ विभागीय स्तरावरील मेळावा नुकताच संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी लोक जनशक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद कुदळे होते. सदर मेळाव्यात महानगरपालिका जिल्हा परिषद व इतर निवडणुका भाजपा व मित्र पक्षाबरोबर युती करून लढवणार असून राज्यात काही ठिकाणी पक्षाचे पुरस्कृत उमेदवार उभे केले असून काही ठिकाणी मित्रपक्ष असलेल्या भाजपा शिवसेना राष्ट्रवादी यांच्याबरोबर मैत्रीपूर्ण लढत करणार असून इतर ठिकाणी मात्र युती सोबत राहणार आहे. महायुतीच्या उमेदवारांना



इतर ठिकाणी पाठिंबा देणार असून महायुतीच्या नेत्यांनी निवडणुका झाल्यानंतर मात्र राज्यस्तरीय कमिटीवर लोकजन शक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांना सहानुभूतीपूर्वक कमिटीत सामावून घेतले पाहिजे. बिहारमध्ये ज्या प्रमाणे भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष एक दिलाने निवडणुका लढवल्याने विरोधी पक्षाला निष्ठाभूत केले त्याप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा महायुतीला ग्रामीण व शहरी भागातून चांगला प्रतिसाद असून महाविकास आघाडीला मात्र या निवडणुकीत एनडीएचे मित्रपक्ष हद्दपार करतील असे वाटते. महाराष्ट्रातील जनतेला महायुतीशिवाय पर्याय राहणार नाही. असे प्रतिपादन लोकजन शक्ती पार्टी रामविलास प्रदेशाध्यक्ष प्रमोद कुदळे यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना प्रमोद कुदळे यांनी सांगितले की, विदर्भातील यापूर्वीची सर्व कार्यकर्त्यांनी बरखास्त करण्यात आले असून पक्षाने नव्या नेतृत्वांना संधी देण्याचा प्रयत्न केला असून पूर्व विदर्भातून एड. बम श्रीकृष्ण व पश्चिम विभागाची जबाबदारी पंकज मनोहरे यांना देण्यात आले असून नागपूर विभाग हा बबलू कडबे यांना प्रभारी म्हणून नेमण्यात आले असून यापुढे जिल्हा जिल्ह्यामध्ये जुन्या नव्या कार्यकर्त्यांना घेऊन पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून ते प्रयत्न करतील. यासाठी महाराष्ट्रामध्ये पक्ष बळकट होण्यासाठी बिहारच्या मंत्र्यांना व आमदारांना तसेच खासदारांना विभागीय मेळाव्यामध्ये आमंत्रित करण्यात येणार असून त्यामुळे पक्ष संघटन प्रचंड स्वरूपामुळे मजबूत होईल. अशी आशा पत्रपरिषदेत व्यक्ती केली. या विभागीय मेळाव्यास महासचिव प्रा.अशोकजी गायकवाड, तुषार मोहोळ, विजय मालवणकर तसेच तन्हा नागपूरी दलित मित्र यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तसेच पंकज मनोहरे शक्ती खत्री, मनोज शिंदे, प्रभुदास दांडरा व इतर मान्यवर उपस्थित होते. आयोजक बबलू कडबे यांनी प्रसिद्धी पत्रकात कळविले आहे.

## आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर व गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी** : आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत या संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे इतर पत्रकार संघानी दखल घेऊन समाजासाठी काम करावे असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब व गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर साहेब यांनी केले.यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे मुंबई येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात व मंत्रालयात सोमवार दि २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी प्रकाशन करण्यात आले.आष्टी तालुका युवा पत्रकार संघ विविध उपक्रम राबवत असून तसेच गेल्या १३ वर्षांपासून दिनदर्शिका प्रकाशित करून सर्वसामान्यांना व इतर सर्व क्षेत्रातील नागरिकांना मोफत वितरण करण्यात येत आहे.सन २०२६ च्या दिनदर्शिकेचे मुंबई येथील महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब यांच्या मुंबई येथील



त्यांच्या मनोरा संपर्क कार्यालयात त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तसेच गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर साहेब यांच्या मंत्रालयातील त्यांच्या दालनात त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तर या दोन्ही हि मान्यवरांनी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक केले यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव गहिनीनाथ पाचबैल, पत्रकार प्रेम पवळ, मारूती सत्रे, सोपान पगारे,बाळु राऊत, महेश गोरे आदी उपस्थित होते.

**आजपर्यंत युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे या मान्यवरांच्या हस्ते झाले प्रकाशन...**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे मागिल १३ वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले यामध्ये जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे,मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे,अन्न नागरी पुरवठा मंत्री छगनजी भुजबळ,पशुसंवर्धन तथा पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, मंत्री अतुलजी सावे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकनकर,माजी मंत्री आ.सुरेश धस, माजी मंत्री धनंजय मुंडे, माजीमंत्री सदाभाऊ खोत,स्व शिवाजीराव कर्डिले,आ रोहित पवार, माजी.आ.बाळासाहेब आजबे,स्व आ.अरुण काका जगताप, माजी.आ.भिमराव धोंडे, गहिनीनाथ गडाचे महंत हभप विठ्ठल महाराज, पनवेलचे आर आर फाऊंडेशनचे अध्यक्ष स्व. राहुल पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले आहे

# लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल ची गार्गी घुमरे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** वसंतदादा पाटील महाविद्यालय येथे झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या कुमारी गार्गी सुधीर घुमरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिचा प्रथम पारितोषिक रुपये ११००/- , प्रशस्ती पत्र व पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटोदा यांच्या वतीने मा.डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसा निमित्त तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा वर्ग ८ वी ते १२ वी विद्यार्थ्यांसाठी होती. या स्पर्धेत विविध शाळा आणि महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. पाटोदा तालुक्यातील नामांकित लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, पाटोदा ने विद्यार्थीनीना वक्तृत्व स्पर्धेत




सहभागी करून भरघोस बक्षिसे मिळविले. स्पर्धेचा विषय होता. "माझ्या स्वप्नातील भारत" कु.घुमरे गार्गी सुधीर हिने उत्कृष्ट भाषण करून उपस्थितांचे मने जिंकली व प्रथम पारितोषिक मिळविले. तसेच तिने तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला. कु.घुमरे गार्गी सुधीर इयत्ता वर्ग ९ वी हिने रुपये ११००/- रोख व प्रमाणपत्र त्याच बरोबर लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या कु. सांगळे नम्रता गणेश वर्ग ९ वी आणि कु. कोकाटे केतकी अनिल वर्ग ८ वी. यांनी ही उत्तेजनार्थ बक्षिसे मिळवून यश प्राप्त केले आहे. या यशस्वी वाटचाली बद्दल शाळेचे प्राचार्य पठाण सर, प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सीमा माळी मॅडम, वसुंधरा एकबोटे मॅडम, उपप्राचार्य सावंत सर आणि इतर शाळेतील सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.त्यांचे या यश बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# २१ वर्षानंतर भरली 'अजिंठा'च्या माजी विद्यार्थ्यांची शाळा;

## गुरुवंदनेने माजी विद्यार्थी झाले भावूक!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** शालेय जीवनातील ते सोनेरी दिवस, वर्गातील ती मस्ती आणि गुरुजींनी दिलेली शिस्त... या सर्व आठवणींना तब्बल २१ वर्षानंतर पुन्हा उजाळा मिळाला. निमित्त होते, सिल्लोड तालुक्यातील अजिंठा येथील जिल्हा परिषद शाळेच्या सन २००३-०४ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा आणि गुरुजन कृतज्ञता सोहळ्याचे. दोन दशकांनंतर एकत्र आलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात पुन्हा एकदा राष्ट्रगीत, प्रार्थना आणि प्रतिज्ञा म्हणून आपल्या जुन्या शालेय जीवनात प्रवेश




केला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पी.व्ही. सोन्ने होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दहावीनंतर रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षण आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे पांगलेले हे मित्र-मैत्रिणी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र आले आणि त्यांनी हा कृतज्ञता सोहळा साकारला

यावेळी उपस्थित असलेल्या निळकंठ लोसरवार, विजय चौधरी, राजेंद्र सरदार, आण्णा जगताप, विजय कालभिले या शिक्षकांसह श्रीमती श्रीरामवार, श्रीमती काळे, श्रीमती महाजन, श्रीमती बनकर आणि श्रीमती वानखेडे या शिक्षिकांनी आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांना पाहून समाधान व्यक्त केले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या प्रगतीचा अहवाल मांडताना "आज आम्ही जे काही आहोत, ते केवळ तुमच्या संस्कारांमुळेच," अशा भावना व्यक्त करत शिक्षकांचे ऋण मान्य केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, २१ वर्षानंतर अनेक विद्यार्थ्यांनी मैदानावर उतरून खो-खो खेळाचा आनंद लुटला. बॅचच्या वतीने सर्व गुरुजनांना सन्मानपूर्वक स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन कृष्णा गजभारे व वैशाली माहोर यांनी केले, तर प्रास्ताविक रघुनाथ पदमे यांनी मांडले. शेवटी संदिप मानकर यांनी सर्वांचे आभार मानले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जयराज चौंडीये, अरुण अग्रवाल, नितीन ढाकरे, निशांत कुलवाल, वर्षा पाटील, कविता गुप्ता, भरत पवार , शंभू देशमुख, किशोर पाटील, दिपक चव्हाण व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले . या स्नेहमेळाव्याला बॅचमधील सुमारे ६० माजी विद्यार्थी उपस्थित होते. वर्षानुवर्षे दुरावलेले सवंगडी पुन्हा भेटल्याने अजिंठा जिल्हा परिषद शाळेचा परिसर आनंदाने आणि आठवणींच्या सुगंधाने न्हाऊन निघाला होता.

# नेपाळ सशस्त्र पोलीस दलाच्या भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी CISF कडून अध्ययन कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी. भोईर :** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) ने आज नेपाळ सशस्त्र पोलीस दल (APF) मधील १९ भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी अध्ययन कार्यक्रमाचे आयोजन केले. नेपाळ सशस्त्र पोलीस दल हे फेडरल डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ नेपाळचे अंतर्गत सुरक्षा, VIP सुरक्षा तसेच महत्त्वाच्या प्रतिष्ठानांच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळणारे मुख्य अर्धसैनिक दल आहे.

हा अध्ययन दौरा नेपाळमधील APF अधिकाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑफिसर्स कोर्सचा एक भाग असून, त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या चौथ्या सत्रादरम्यान हा उपक्रम राबविण्यात आला.

हा संवाद कार्यक्रम CISF मुख्यालय, नवी दिल्ली येथील परिषद सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री विजय प्रकाश, IPS, अतिरिक्त महासंचालक (मुख्यालय) यांनी भूषविले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात, CISF चे महानिरीक्षक (प्रशिक्षण) श्री विनय काजले यांनी भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांना देशाच्या महत्त्वाच्या संपत्तींच्या सुरक्षिततेसाठी CISF ची भूमिका, जबाबदाऱ्या व कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर CISF च्या कार्यात्मक, प्रशासकीय व कल्याणकारी कामकाजावर आधारित सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांना CISF कडून उदयोन्मुख सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. यामध्ये हैदराबाद येथील राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा अकादमी तसेच भिलाई येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात ड्रोन प्रशिक्षण शाळांची स्थापना यांचा समावेश आहे, ज्याचा उद्देश संभाव्य ड्रोन धोक्यांना रोखणे हा आहे.



संवाद सत्रादरम्यान, नेपाळ APF अधिकाऱ्यांनी CISF च्या पोस्टिंग धोरणासह विविध अंतर्गत कार्यपद्धतींबाबत माहिती मागितली, ज्याचे समाधानकारक उत्तर संबंधित CISF अधिकाऱ्यांनी दिले. तसेच CISF कडून दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक सुरक्षा सल्लागार सेवांची भूमिकाही अतिरिक्त महासंचालक (मुख्यालय) यांनी स्पष्ट केली. CISF खासगी, शासकीय व निमशासकीय संस्थांना नाममात्र शुल्कावर ही अद्वितीय सल्लागार सेवा पुरवते, ज्याचा उद्देश महत्त्वाच्या प्रतिष्ठानांची सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करणे हा आहे.

समारोपाच्या भाषणात, नेपाळ सशस्त्र पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक (DIG) श्री शंभू सुबेदी यांनी भारत सरकार व CISF यांचे उत्कृष्ट आतिथ्य व औद्योगिक सुरक्षेबाबत दिलेल्या मौल्यवान मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, हा संवाद दोन्ही दलांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यास उपयुक्त ठरेल.

## महाविकास आघाडीकडून शिवसेना (उबाठा ) तर्फे यतीन देशमुख यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका निवडणूकसाठी प्रभाग 16 मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उम्मेदवार यतीन विनायक देशमुख यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगरप्रमुख अवचित राऊत, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, पनवेल शहर प्रमुख प्रविण जाधव आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नातून महामार्गासाठी अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पैठण–शिरूर (कासार)–खर्डा या एनएच–752E राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामांसाठी आमदार सुरेश धस यांनी ४ डिसेंबर रोजी केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे पत्राद्वारे केलेल्या मागणीची केंद्र सरकारने तातडीने दखल घेतली आहे. या मुळे महामार्गाच्या दोन्ही पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार धस यांनी आपल्या पत्रात एनएच–752E अंतर्गत पैठण–शिरूर (कासार) आणि शिरूर (कासार)–खर्डा या दोन्ही पॅकेजमधील भूसंपादनातील वाढीव खर्चाची वस्तुस्थिती केंद्राच्या निदर्शनास आणून दिली होती. प्रत्यक्ष संयुक्त मोजणीनंतर भूसंपादन क्षेत्र




व खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे उर्वरित रस्ता कामे रखडल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. दोन्ही पॅकेजमधील बहुतांश गावांचे भूसंपादन पुरस्कार जाहीर झाले असून सुमारे ८० टक्के रस्ता कामे पूर्ण झाली आहेत. मात्र अतिरिक्त निधी अभावी उर्वरित कामे थांबली असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी संबंधित प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंत्यांना भूसंपादन कायदा व मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारकडून ठोस हालचाली सुरू झाल्या असून, या निर्णयामुळे पाटोदा, आष्टी, शिरूर (कासार) व परिसरातील नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. लवकरच उर्वरित महामार्ग कामे पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# घंटागाडीच नाही, कचराकुंडीही नाही; बाभुळगाव बु. ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे /निफाड तालुका प्रतिनिधी :** तालुक्यातील बाभुळगाव बु. येथे कचरा व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न उभा राहिला असून, कचरा कुंडी अथवा घंटागाडीची सुविधा नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः पाटोदा रोडवरील म्हसोबा कॉलनी परिसरात कचरा उचलण्याची कोणतीही नियमित व्यवस्था नसल्याने नागरिकांना नाईलाजाने इकडे-तिकडे कचरा टाकावा लागत आहे.कचरा उचलण्याची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांच्या घरासमोर तसेच रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचत असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, लहान मुले, महिला आणि



ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्वच्छतेअभावी डास, माश्या वाढण्याची भीती व्यक्त होत असून विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे.या गंभीर समस्येबाबत नागरिकांनी सरपंच तसेच ग्रामसेवक यांना दिनांक १९/११/२०२५ रोजी लेखी निवेदन दिले होते. मात्र, त्या निवेदनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार फोन करून माहिती दिली असता, उडवा-उडवीची उत्तरे मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे."कर भरतो, मात्र मूलभूत सुविधा मिळत नाहीत," अशी भावना संतप्त नागरिक व्यक्त करत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने घंटागाडी सुरू करावी किंवा कचरा कुंडीची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा परिसरातील सर्व कचरा थेट ग्रामपंचायत कार्यालयात आणून टाकण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला असून, याची गंभीर नोंद ग्रामपंचायत प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.बाभुळगाव बु. येथील नागरिकांनी स्वच्छ, आरोग्यदायी वातावरण मिळावे यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, ग्रामपंचायत प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अपुऱ्या शिक्षक संख्येमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान; दि.२ जानेवारीला निफाड पंचायत समितीवर मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अपुऱ्या शिक्षक संख्येमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे मंजूर पदे तातडीने न भरल्यास शुक्रवार दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी प्राथमिक शाळेला कुलूप लाऊन, निफाड पंचायत समिती कार्यालयावर विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

या शाळेत एकूण चार उपशिक्षक, दोन पदवीधर शिक्षक आणि एक मुख्याध्यापक अशी सात पदे मंजूर आहेत. मात्र, प्रत्यक्षात केवळ तीनच शिक्षकांवर सात वर्गांचा संपूर्ण कारभार चालत आहे. इयत्ता पहिली ते पाचवीत १९७ विद्यार्थी असून या वर्गांसाठी



पटाधारीत चार शिक्षक आवश्यक आहेत; मात्र सध्या तीनच शिक्षक कार्यरत आहेत. इयत्ता पाचवी व सहावीचा एकूण ५८ पट असून या दोन वर्गांसाठी दोन पदवीधर शिक्षक आवश्यक आहेत, मात्र सध्या एकही पदवीधर शिक्षक नाही.सन २०१९ पासून शाळेत भाषा पदवीधर शिक्षकच नाही, तर गणित पदवीधर शिक्षक मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कारभार पाहत गणित शिकवत होते. त्यांच्या बदलीनंतर आता गणित शिक्षकही नसल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. काही दिवसांपूर्वी शाळेला मुख्याध्यापक नेमण्यात आले होते, मात्र त्यांनी केवळ आठच दिवसांत बदली करून घेतली. या शाळेत तब्बल १८ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही. त्यामुळे त्यांची सरल पोर्टलवर नोंद होत नाही. त्यामुळे ते विद्यार्थी 'बोगस' ठरले आहेत. परिणामी विद्यार्थी संख्या कमी दिसत असल्याने शिक्षक संख्येत अजून कपात झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे तातडीने मंजूर पदे भरावीत, याबाबत पालकांनी वेळोवेळी मंजूर शिक्षक पदे भरण्यासाठी वारंवार लेखी व तोंडी विनंती केली आहे, मात्र ग्रामस्थांना केवळ आश्वासनाशिवाय काही मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे शुक्रवार दिनांक २ जानेवारी २०२६

पूर्वी मंजूर पदे तातडीने न भरल्यास शुक्रवार दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी प्राथमिक शाळेला कुलूप लाऊन, निफाड पंचायत समिती कार्यालयावर विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.निवेदनाच्या प्रति, मा.तहसिलदार साहेब, निफाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक लासलगाव, मा.शिक्षण विस्तार अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

# रेल्वेखाली आल्याने महिलेचा मृत्यू...

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना (अशोक ठोके) :** खांडवी, तालुका परतूर, जिल्हा जालना येथील महिला कौसाबाई नाथा साळवे या रेल्वेखाली आल्याने त्यांचा करून अंत झाला आहे. या बाबत त्यांचे नातू प्रदिप राजेभाऊ साळवे वय 24 वर्षे व्यवसाय शिक्षण रा.खांडवी ता. परतुर जि. जालना याबाबत दिलेल्या जबाबात असे म्हटले आहे की माझी आजी नामे कौसाबाई नाथा साळवे वय 56 वर्षे ह्या रेल्वे अपघातात मरण पावल्या आहेत.मी माझ्या कुंटुबासह खांडवी येथे एकत्रित राहतो. दि.28 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 04.00 वाजेच्या सुमारास माझी आजी कौसाबाई ह्या घरात कोणास काहीएक



न सांगता घरातुन निघुन गेल्या होत्या व त्या वयस्कर असल्याने त्यांना दिसत पण नव्हते आणि ऐकु सुध्दा कमी येत होते. त्यानंतर आम्हांस संध्याकाळी 08.00 वाजेच्या सुमारास आम्हांला कळाले की, माझी आजी कौसाबाई ह्या खांडवी ते उस्मानपुर च्या पुलाजवळील रेल्वे पटरी येथे एका रेल्वे च्या अपघातामध्ये माझी आजी हि मरण पावलीअसल्याचे आम्हांला समजले तेव्हा आम्ही त्या ठिकाणी जाऊन पाहीले असता माझी आजी हि मयत झालेली होती.या या घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिस बलाचे कॉन्स्टेबल मिठाईलाल व परतूर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल अशोक गाढवे हे घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून बॉडी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी आणण्यात आली.सकाळी 10 वाजता शवविच्छेदन करून आले प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. पुढील तपास परतुर पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल अशोक गाढवे हे करीत आहेत.

# टीसीएसने सुरु केला ब्लाइंड बेक कॅफे

## ब्लाइंड बेक कॅफे हा कॉर्पोरेट कॅम्पसमध्ये दृष्टिहीन व्यक्तींद्वारे चालवला जाणारा पहिला कॅफे आहे

## समावेशकता आणि सक्षमीकरणाची इकोसिस्टिम निर्माण करण्याच्या टीसीएसच्या वचनबद्धतेचा हा एक भाग आहे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय उपायांमध्ये जागतिक आघाडीवर असलेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) (बीएसई: ५३२५४०, एनएसई: TCS) ने ठाणे येथील त्यांच्या ऑलिंपस कॅम्पसमध्ये ब्लाइंड बेक कॅफे सुरु केला आहे कॉर्पोरेट कॅम्पसमध्ये दृष्टिहीन व्यक्तींद्वारे चालवला जाणारा हा पहिला कॅफे आहे. हा उपक्रम टीसीएसच्या समावेशकतेसाठीच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

टीसीएसने नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (एनएबी) इंडिया सेंटर फॉर ब्लाइंड वुमन अँड डिसॅबिलिटी स्टडीजच्या सहयोगाने ब्लाइंड बेक कॅफे सुरु केला आहे. या कॅफेमधील सर्व कर्मचारी दृष्टिहीन आहेत, त्यांना बेकरी, कॅफे व्यवस्थापन आणि ग्राहक सेवेमध्ये एनएबीने प्रशिक्षित केले आहे. या टीममध्ये दोन शेफ आणि




एक सर्व्हिस स्टाफ आहे, जे ताजे बेक केलेले केक, शेक, स्नॅक्स, पेये आणि मिठाई तयार करण्यात कुशल आहेत. ठाण्यातील ब्लाइंड बेक कॅफे हा विविध टीसीएस कॅम्पसमध्ये असाच उपक्रम स्थापन करण्याच्या व्यापक धोरणात्मक योजनेचा पहिला टप्पा आहे. अपंग व्यक्तींना रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी प्रदान करून, टीसीएस समावेशकता आणि सक्षमीकरणाची इकोसिस्टिम निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करते.

एनएबी इंडिया - सेंटर फॉर ब्लाइंड वुमन अँड डिसॅबिलिटी स्टडीजच्या संचालिका श्रीमती शालिनी खन्ना सोधी म्हणाल्या, "टीसीएसमध्ये ब्लाइंड बेक कॅफे सुरू केल्याचा आम्हाला अभिमान आहे. ही भागीदारी केवळ कॅफेचा नवीन पर्याय नाही, तर दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींसाठी स्वातंत्र्य आणि सक्षमीकरणाचा मार्ग आहे. जीवनात अनेक आव्हानांना तोंड देणाऱ्यांसाठी अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या उद्योगांना पाठिंबा देऊन, आम्ही एक समावेशक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करतो जिथे प्रतिभेला कोणतेही अडथळे नसतात. संधींद्वारे स्वातंत्र्य वाढवण्यावर आमचा विश्वास आहे आणि ब्लाइंड बेक कॅफे या दृष्टिकोनाचे प्रतीक आहे."

हा उपक्रम टीसीएसच्या समावेशक उद्दिष्टांशी सुसंगत आहे. कामाच्या ठिकाणी समावेशकतेला प्रोत्साहन देणे आणि अपंग व्यक्तींसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाद्वारे, टीसीएसचे मनुष्यबळ अधिक समावेशक आणि विविधतेला आधार देणारे बनवण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी, जागरूकता आणि संवेदनशीलता वाढवणारे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी त्यांची वचनबद्धता आणि प्रयत्न सुरू असतात.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे ह्युमन रिसोर्सेसचे व्हाईस प्रेसिडेंट, श्री. डीपी नंबियार म्हणाले, "आम्ही मानतो की अपंग व्यक्तींच्या गरजांबद्दल समावेश आणि संवेदनशीलता केवळ प्रशिक्षण कक्ष आणि मॉड्यूलपुरती मर्यादित नसावी. अपंग व्यक्तींच्या विविध क्षमतांचे प्रदर्शन करणे आणि टीसीएस सहयोगींना विविध गरजा असलेल्या लोकांशी जोडणे यामुळे सर्वसमावेशक वातावरण तयार करण्यास मदत होईल. ही मुख्य कल्पना टीसीएसमधील आपल्या सर्वांच्या खूप जवळ आहे आणि याच दृष्टिकोनातून आम्ही हा प्रकल्प सुरू केला आहे. ठाण्यातील टीसीएसच्या ऑलिंपस कॅम्पसमध्ये ब्लाइंड बेक कॅफे सुरू करण्यासाठी आम्हाला एनएबीसोबत सहयोग केल्याचा अभिमान आहे. हे कॅफे खरोखरच समावेशक जागा आहे जी कर्मचाऱ्यांच्या गरजा आणि टीसीएस सहकाऱ्यांशी त्यांचे संवाद लक्षात घेऊन डिझाइन केलेले आहे. ब्रेल साधने प्रदान करण्यापासून ते स्वयंपाकाच्या पर्यायी पद्धतींच्या विशेष प्रशिक्षणापर्यंत, हा कॅफे इंडिया आयएनसीने हाती घेतलेल्या समावेशक उपक्रमांमध्ये एक नवीन मानक स्थापित करेल."

२०२१ मध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरु करण्यात आलेला, ब्लाइंड बेक कॅफे हा दृष्टिहीन व्यक्तींनी चालवलेल्या सिम्युलेशन कॅफेपासून सुरु होऊन आता टीसीएसमध्ये पूर्णपणे कार्यरत असलेले आउटलेट बनले आहे. ब्लाइंड बेक कॅफेमधून मिळणारे सर्व उत्पन्न थेट दृष्टिहीन कर्मचाऱ्यांना आणि ब्लाइंड बेक कॅफेच्या कामकाजासाठी वापरले जाईल. या निधीचा वापर अधिक दृष्टिहीन व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी केला जाईल, ज्यामुळे त्यांना व्यावसायिक शेफ म्हणून प्रमाणपत्र आणि रोजगार मिळू शकेल.

# मिनी मंत्रालय’साठी शिंदे सेनेची तयारी; ३२ डिसेंबरला उमेदवारांच्या मुलाखती

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** आगामी पंचायत समिती व तालुका स्तरावरील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवार निवड प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे.त्याच अनुषंगाने बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर रोजी दुपारी ठीक ३ वाजता सोयगाव येथील शिवसेना भवन येथे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.या मुलाखतींमध्ये इच्छुक उमेदवारांचा जनसंपर्क,संघटनात्मक काम,पक्षनिष्ठा,



सामाजिक कार्य व निवडणूक लढवण्याची क्षमता यांचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.‘मिनी मंत्रालय’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समितीवर वर्चस्व मिळवण्यासाठी शिंदे सेनेने तयारी सुरू केल्याने तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.या मुलाखतीसाठी सर्व इच्छुक उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे,असे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख आबासाहेब काळे व शिवसेना तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

# जिंतीच्या ज्ञानमंदिराचे शतक महोत्सव वर्षात पदार्पण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : जिंती ता. कराड येथील जी. प . शाळा जिंतीला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. याच ज्ञानमंदिरातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेऊन ध्येयापर्यंत पोहोचले. ग्रामस्थांच्या, ज्ञानप्रबोधनी फाउंडेशन व शिक्षकांच्या संयुक्त संयोजनाने शतक महोत्सवी वर्षानिमित्त *एक महिना एक कार्यक्रम* करण्याचा मानस आहे. याच पार्श्वभूमीवर १५ डिसेंबर रोजी शाळेत कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

कार्यक्रमावेळी केंद्रप्रमुख सौ.धनश्री जगताप म्हणाल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगण विकासासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा जपणे काळाची गरज आहे. शाळा हे पवित्र ज्ञान मंदिर आहे. ज्ञान मंदिरातून जीवन मूल्यांचे शिक्षण अखंडपणे दिले जात आहे. शाळेच्या शतक महोत्सवी वर्षात माजी विद्यार्थी असणे भाग्याचे लक्षण आहे.

वारकरी संप्रदायाचे व माजी विद्यार्थी भिकू पाटील(आबा) महाराष्ट्र संतांची भूमी आहे नवीन पिढीला संतांचे विचार , चांगल्या संस्काराची व शिक्षणाची गरज आहे. सुविधा उपलब्ध नसतानाही आम्ही शिकलो याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. माजी विद्यार्थी किसान साळुंखे गुरुजी म्हणाले त्यावेळेस शाळा ही मंदिर



किंवा घर अशा ठिकाणी भरायची पण शिक्षण महत्वाचे होते. मी शिकलो आणि याच पवित्र क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हेच माझे भाग्य आणि शतक महोत्सवी सोहळयास उपस्थित राहता आले हे परमेश्वराचे आभार. यावेळी सुहास पाटील (सर) यांनी संकलीत केलेल्या शिवचरित्रा वरील चित्रांचे प्रदर्शन आयोजीत केले होते.

कार्यक्रमास यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैभव पाटील तर उपाध्यक्ष जयवंत शेवाळे ग्रामपंचायत सदस्य राजाराम पाटील, संजय पाटील, विक्रम घागरे, दिगंबर पाटील, सायली पाटील, मनिषा थोरात, सविता जाधव, ज्योती चव्हाण, गौरी चव्हाण, आनंदा मेणकर, निलेश पाटील, सचिन पाटील विलास चव्हाण , मेहुल आंबवडे उपस्थित होते.प्रास्ताविक सुहास पाटील व सुत्रसंचलन वैशाली साळुंखे यांनी केले तर आभार दिलीप नायकवडी यांनी मानले.

# ईव्हीएम मशीन मध्ये घोळ झाल्यामुळे भंडारा नगरपरिषद 2025 ची झालेली निवडणूक रद्द करून नव्याने बायलट पेपर द्वारे घ्या- विविध राजकीय पक्ष्यांची मागणी

## जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्य राज्य निवडणूक आयुक्त, राज्यपाल यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** भंडारा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 अंतर्गत मतमोजणी दरम्यान प्रभाग क्रमांक ३ मधील सदस्य उमेदवाराचे अपूर्ण निकाल प्रदर्शित झालेले आहे. त्यात सौ करुणा ऋषी राऊत( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार) पक्षाची उमेदवार आणि नोटा या दोन उमेदवार समोरील मत व नाव ईव्हीएम मशीन वर प्रदर्शित न झाल्याने या दोघांना मिळालेले मत माहिती



होऊ शकलेले नाही .याची शहानिशा न करता मशीनवर थेट अर्धवट प्रदर्शित झालेले निकाल घोषित करण्यात आले. या गोंधळ निर्माण करणाऱ्या घटनेने ,मतदार ,उमेदवार तसेच सर्व राजकीय पक्षांमध्ये ईव्हीएम संदर्भातील पारदर्शकता आणि विश्वासहर्ता बद्दल संशय निर्माण झालेला आहे .त्यामुळे आज दिनांक 29 डिसेंबर 2025 ला दसरा मैदान भंडारा येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रभाग क्रमांक ३ प्रमाणे इतरही प्रभागात असा घोट झालेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्व प्रभागात सदस्य आणि नगराध्यक्ष पदाची निवडणूक नव्याने ईव्हीएम मशीन ऐवजी पूर्वीप्रमाणे बायलट पेपर वर घेण्यात यावे .या प्रकरणात जबाबदार निवडणूक अधिकारी, मॉडल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी यापुढे होणाऱ्या सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, ही भंडारा शहरवासी मतदारांची मागणी आहे. यावेळी निवेदन देताना भंडारा पवनी विधानसभेचे आमदार नरेंद्र भोंडेकर माजी आमदार चरण भाऊ वाघमारे माजी राज्यमंत्री नानाभाऊ पंचबुद्धे, महिला आघाडी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष जयश्री बोरकर, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोहन पंचबुद्धे, युवराज उके, वंचित बहुजन आघाडीचे डी जी रंगारी , बहुजन समाज पार्टी, आझाद समाज पार्टी, आंबेडकरवादी संघर्ष पार्टी एल वाय नंदागवळी, बहुजन रिपब्लिकन आघाडी, बहुजन मुक्ती, सोशालिस्ट पार्टी, व विविध पक्षाचे पदाधिकारी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# वर्षा अखेरचा अरुणोदय वॉकर कार्यक्रम झाला संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी)** : रोज सकाळी नियमित चालणे फिरणे हास्य योगा व गप्पांच्या मैफिली रंगणारे अरुणोदय वॉकर्सचे सभासद हितचिंतक यांची २०२५ मधील महिना व वर्षा अखेरचा वाढदिवस गप्पा छप्पा विनोद हास्यकल्लोळ व पुढील वर्षाचे चालण्याच्या स्पर्धेचे नियोजन याकरिता एका खास सभेचे रविवार दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी कलानगर, बांद्रा पूर्व या ठिकाणी अतिशय आनंदी स्वरूपात संपन्न झाला.व्यासपीठावर ज्येष्ठ सल्लागार श्री निळकंठ श्रीखंडे,श्री किरण भोगले, श्रीमती अंजली रिसोड, श्री दिलीप गाडेकर, श्रीमती शैलजा सोमानी आणि श्रीमती शिल्पा शिरोळे आदी मंडळी उपस्थित होते यावेळी डिसेंबर महिन्यातील येणारे जन्मदिन निमित्त कुसुम पन्नडकर,नम्रता प्रभू सुषमा चुरी, हरीश भाई रंधेरीया व उर्दू




कवयित्री असरत अजमी आणि कुणाल तावरे यांना शुभेच्छा व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर मागील महिन्यात शब्दकोडी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यातील तीन विजेत्यांना प्रसिद्ध कवयित्री जयश्री चौधरी यांच्या हस्ते स्वखर्चातून तीन पारितोषिके देण्यात आली.तसेच ८ फेब्रुवारी २०२६ मध्ये होणारी रेस यांचे नियोजन करून तीन लीडर यांची नेमणूक करण्यात आली.

# लोकशाहीत मत हे केवळ एक आकडा नसून ते मतदाराच्या स्वाभिमानाचे, जाणीवेचे आणि विचारस्वातंत्र्याचे प्रतीक असते

आजच्या राजकारणात जिथे मतांचे व्यवहार, आमिषे, फसवी आश्वासने आणि दबावतंत्र यांची चर्चा सर्रास होत असते, तिथे पुण्यातील एका साध्याशा पाटीने मात्र लोकशाहीच्या मुळावर नेमके बोट ठेवले आहे.

“या घरातील सर्व मतदार वंचित बहुजन आघाडीचे आहेत. इतर पक्षांनी वेळ व खर्च वाया घालवू नये,” असे निर्भीडपणे सांगणारी ही पुणेरी पाटी म्हणजे केवळ एका घराचा राजकीय जाहीरनामा नाही, तर आजही स्वाभिमान जपणाऱ्या मतदारांची सामूहिक भावना व्यक्त करणारी ठाम भूमिका आहे.

मत विकणारे असतील, पण आजही आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांचे एकनिष्ठ, प्रामाणिक आणि विचारांशी निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने आहेत, हे या पाटीने ठणकावून सांगितले आहे. राजकारणात निष्ठा, तत्व आणि विचारधारा संपत चालली आहे, असा सूर सातत्याने ऐकू येतो; मात्र ही पाटी त्या समजुतीला थेट छेद देते.या पाटीतील “भाकरी आणि आचारी”चे उदाहरण तर आजच्या देशस्थितीवर केलेले



अत्यंत मार्मिक भाष्य आहे. भाकरी करपली की तवा बदलायचा, पीठ बदलायचं, पाणी बदलायचं, चूल बदलायची; पण कधीही ‘आचारी बदला’ असे कोणी म्हणायला तयार नसते. हे उदाहरण म्हणजे चुकीच्या धोरणांचे, अपयशी नेतृत्वाचे आणि जबाबदारी टाळणाऱ्या व्यवस्थेचे आरसाच आहे.सत्ता चालवणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करण्याऐवजी केवळ साधनांमध्ये बदल करून अपयश झाकण्याचा प्रयत्न केला, तर परिणाम बदलत नाहीत—हेच या उदाहरणातून स्पष्ट होते. प्रश्न साधनांचा नाही, तर नेतृत्वाचा आहे, ही भूमिका या पाटीतून ठळकपणे समोर येते.

आजचा मतदार पूर्वीपेक्षा अधिक सजग आहे. तो घोषणांपेक्षा कृती पाहतो, आश्वासनांपेक्षा विचारधारा तपासतो. त्यामुळेच वंचित बहुजन आघाडीप्रती असलेली निष्ठा ही भावनिक नव्हे, तर वैचारिक असल्याचा ठाम संदेश या संपादकीय पाटीतून दिला जातो.

ही पाटी म्हणजे प्रचाराला नकार देणारी आणि विचारांना मान देणारी लोकशाही भूमिका आहे. “आता वंचित बहुजन आघाडीच सर्व सूत्रे हातात घेण्याची ताकद ठेवते,” हा दावा समर्थनासाठी नव्हे, तर व्यवस्थाबदलाच्या अपेक्षेतून पुढे आलेला आहे.लोकशाहीच्या प्रवासात अशा स्पष्ट, निर्भीड आणि स्वाभिमानी भूमिकांची आज अधिक गरज आहे. कारण जेव्हा मतदार स्वतःचा आवाज पाटीवर लिहू लागतो, तेव्हा समजून घ्यावे—लोकशाही अजून जिवंत आहे.

**लेख:- प्रकाश गवारे**

# शाळेजवळील रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची मागणी – राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** जोगेश्वरी (पूर्व) परिसरातील शाळेजवळील रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्यामुळे लहान मुलांचे व पालकांचे जीव धोक्यात येत असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करत राष्ट्रवादी युवक काँग्रेस, मुंबई प्रदेशचे सचिव श्री. अजित म्हामुणकर यांनी वाहतूक पोलिसांकडे निवेदन दिले आहे.

जोगेश्वरी (पूर्व) विभागातील शाळेजवळील रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. मात्र त्या ठिकाणी ना वाहतूक सिग्नल आहे, ना स्पीड ब्रेकर, तसेच वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांची नियमित उपस्थिती नसल्यामुळे शाळा सुरू व सुटण्याच्या वेळेत अपघात होण्याची शक्यता कायम असते. यामुळे परिसरातील नागरिक, पालक व शाळकरी मुले भीतीच्या वातावरणात




रस्ता ओलांडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात श्री. म्हामुणकर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, जोगेश्वरी (पूर्व) यांच्याकडे निवेदन सादर करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. शाळेच्या वेळेत वाहतूक पोलीस / वॉर्डन नेमावेत, वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी, तसेच संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी ठोस मागणी त्यांनी केली आहे.

विशेषतः जोगेश्वरी मेट्रो स्टेशन, SRP कॅम्प गेट क्रमांक ८ समोर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगत असलेला हा भाग वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असून येथे लवकरात लवकर स्पीड ब्रेकर, सूचना फलक व आवश्यक असल्यास सिग्नल बसवावा, अशी मागणी नागरिकांनीही केली आहे.या विषयावर त्वरीत कार्यवाही न झाल्यास भविष्यात गंभीर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.